दादा भगवान कथित

# मृत्यूवेळी

## आधी आणि नंतर

कुठल्याही वस्तूचा जन्म झाला,
म्हणजे त्याचा मृत्यू अवश्य होतो.
हे जन्म-मरण आत्म्याचे नाही,
आत्मा परमनन्ट वस्तू आहे.

Marathi

दादा भगवान कथित

# मृत्यूवेळी, आधी आणि नंतर...

मूळ गुजराती संकलन : डॉ. नीरूबहन अमीन

अनुवाद : महात्मागण

**प्रकाशक :** **श्री अजित सी. पटेल**

**दादा भगवान आराधना ट्रस्ट,**

दादा दर्शन, 5, ममतापार्क सोसायटी,

नवगुजरात कॉलेजच्या मागे, उस्मानपुरा,

अहमदाबाद - 380014, गुजरात.

**फोन - ( 079 ) 39830100**

© All Rights reserved with - Dada Bhagwan Foundation Trust,

© 5, Mamta Park Society, B\h. Navgujarat College,

Usmanpura, Ahmedabad - 380014, Gujarat, India.

No part of this book may be used or reproduced in any manner whatsoever without written permission from the holder of the copyrights.

**प्रथम आवृत्ति** : 1,500 ऑक्टोबर, 2016

**नवीन रीप्रिन्ट** : 3,000 जुलै 2019

**भाव मूल्य :** 'परम विनय' आणि

'मी काहीच जाणत नाही', हा भाव!

**द्रव्य मूल्य :** **15 रुपये**

**मुद्रक** : अंबा ऑफसेट

B-99, इलेक्ट्रोनीक्स GIDC,

क-6 रोड, सेक्टर-25,

गांधीनगर-382044.

**फोन :** (079) 39830341

# त्रिमंत्र





नमो अरिहंताणं

नमो सिद्धाणं

नमो आयरियाणं

नमो उवज्झायाणं

नमो लोए सव्वसाहूणं

एसो पंच नमुक्कारो

सव्व पावप्पणासणो

मंगलाणं च सव्वेसिं

पढमं हवइ मंगलं ॥ १ ॥

ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥ २ ॥

ॐ नमः शिवाय ॥ ३ ॥

जय सच्चिदानंद





# दादा भगवान कोण?

जून 1958 संध्याकाळची अंदाजे सहाची वेळ, सुरत स्टेशनवर अलोट गर्दी होती. रेल्वेच्या प्लेटफॉर्म नंबर तीनच्या बाकावर बसलेल्या श्री अंबालाल मूळजीभाई पटेल रुपी देहमंदिरात नैसर्गिक स्वरुपात कित्येक जन्मांपासून व्यक्त होण्यासाठी आतूर असलेले 'दादा भगवान' संपूर्णपणे प्रकट झाले आणि निसर्गाने सर्जन केले अध्यात्माचे अद्‌भुत आश्चर्य! एका तासात विश्वदर्शन लाभले! मी कोण? भगवंत कोण? जग कोण चालवत आहे? कर्म म्हणजे काय? मुक्ती कशाला म्हणतात? इत्यादी जगातील सर्व आध्यात्मिक प्रश्नांची रहस्ये संपूर्णपणे प्रकट झाली. अशाप्रकारे निसर्गाने विश्वाला प्रदान केले एक अद्वितीय, संपूर्ण दर्शन आणि ह्याचे माध्यम बनले अंबालाल मूळजीभाई पटेल, जे होते गुजरातच्या चरोतर जिल्ह्यातील भादरण गावचे पाटील, कॉन्ट्रॅक्टचा व्यवसाय करणारे आणि तरीही पूर्ण वीतराग पुरुष.

त्यांना प्राप्ती झाली तशी ते फक्त दोन तासात इतर मुमुक्षुनां सुद्धा आत्मज्ञानाची प्राप्ती करवित असत, त्यांच्या सिद्ध झालेल्या अद्‌भुत ज्ञान प्रयोगाद्वारे. त्याला अक्रम (क्रमविरहीत) मार्ग म्हटले जाते. अक्रम म्हणजे क्रमाशिवायचा आणि क्रम म्हणजे पायरी पायरीने, क्रमाक्रमाने वर चढणे! अक्रम म्हणजे लिफ्ट मार्ग! शॉर्ट कट!

ते स्वत: प्रत्येकाला 'दादा भगवान कोण?' याबद्दलची फोड करून देताना म्हणायचे की, ''हे दिसतात ते 'दादा भगवान' नाहीत. हे तर 'ए.एम. पटेल' आहेत. आम्ही ज्ञानीपुरुष आहोत आणि आत प्रकट झाले ते दादा भगवान आहेत. दादा भगवान तर 'चौदालोकाचे' नाथ आहेत, ते तुमच्यात पण आहेत, सर्वांमध्ये आहेत! तुमच्यात अव्यक्त रुपात आहेत आणि 'येथे' माझ्या आत संपूर्णपणे व्यक्त झालेले आहेत! माझ्या आत प्रकट झालेले 'दादा भगवान' यांना मी पण नमस्कार करतो.''

व्यापारात धर्म असावा परंतु धर्मात व्यापार नसावा. या सिद्धांताने त्यांनी आपले संपूर्ण जीवन व्यतीत केले. संपूर्ण जीवनात त्यांनी कधीही, कोणाकडूनही पैसे घेतले नाहीत, उलट स्वत:च्या व्यवसायातून झालेल्या फायद्यातून भक्तांना यात्रा करवित असत.

# संपादकीय

मृत्यू मनुष्याला अतिशय भयभीत करतो, किती तरी शोक उत्पन्न करवतो आणि केवळ दु:खातच बुडवून ठेवतो. प्रत्येक मनुष्याला जीवनात कोणाच्यातरी मृत्यूचे साक्षी बनावेच लागते. त्यावेळी मृत्यूसंबंधी शेकडो विचार मनात येतात, की मृत्यूच्या स्वरुपाची वास्तविकता काय असेल? परंतु त्याचे रहस्य न उलगडल्यामुळे तो तेथेच अडकून पडतो. मृत्यूचे रहस्य जाणण्यासाठी प्रत्येक व्यक्ती उत्सुक असतेच. त्या बाबतीत बरेच काही ऐकण्यात किंवा वाचण्यात येते. लोकांकडूनही काही माहिती मिळते परंतु ते केवळ बुद्धीचे तर्कच असतात.

मृत्यू काय असेल? मृत्यूच्या आधी काय होत असेल? मृत्यूच्या वेळी काय होत असेल? मृत्यूनंतर काय होत असेल? मृत्यूचा अनुभव कोण सांगू शकेल? ज्याचा मृत्यू होतो तो आपला अनुभव सांगू शकत नाही. ज्याचा जन्म होतो, तो आपली पूर्वीची अवस्था, स्थिती जाणत नाही. अशा प्रकारे जन्माआधीची आणि मृत्यूनंतरची अवस्था कोणीच जाणत नाही. म्हणून मृत्यूच्या आधी, मृत्यूवेळी आणि मृत्यूनंतर कोणत्या दशेतून जावे लागेल, याचे रहस्य, हे रहस्यच राहते. दादाश्रींनी आपल्या ज्ञानात पाहून हे सगळे रहस्य, जसेच्या तसे, यथार्थ रुपाने उघडले आहे, जे येथे संकलित केलेले आहे.

मृत्यूचे रहस्य समजले की मृत्यूचे भय निघून जाते.

आपल्या प्रिय व्यक्तीच्या मृत्यूसमयी आपण काय करायला पाहिजे? आपले खरे कर्तव्य काय आहे? त्याची गती कशाप्रकारे सुधारायला हवी? प्रिय व्यक्तीच्या मृत्यूनंतर आपण काय करायला हवे? आपण कशाप्रकारे समता ठेवली पाहिजे?

आणि ज्या लोकमान्यता आहेत, जसे की श्राद्ध, तेरावे, ब्राह्मण भोजन, दान, गरुड पुराण इत्यादी गोष्टींची सत्यता किती? मरणाऱ्या व्यक्तीपर्यंत काय काय पोहोचते? त्या सर्व गोष्टी करायला हव्यात की नको? मृत्यूनंतर गतीची स्थिति, वगैरे सर्व खुलासे इथे स्पष्ट होतात.

अशी भयभीत करणारी मृत्यूची रहस्ये जेव्हा उलगडतात तेव्हा

मनुष्याला त्याच्या जीवनकाळात व्यवहारात येणाऱ्या अशा प्रसंगी निश्चितच सांत्वन शांत्वन मिळते.

'ज्ञानी पुरुष' म्हणजे जे देहापासून, देहाच्या सर्व अवस्थांपासून, जन्मापासून, मृत्यूपासून वेगळेच राहतात. या सर्व गोष्टींचे जे निरंतर ज्ञाता-दृष्टा राहतात, आणि अजन्म-अमर आत्म्याच्या अनुभव दशेत राहतात ते! जीवनाच्या आधी, जीवनानंतर आणि देहाच्या अंतिम अवस्थेत, अजन्म-अमर अशा आत्म्याच्या स्थितीची हकीगत काय आहे, हे ज्ञानीपुरुष ज्ञानदृष्टीने अगदी स्पष्टपणे सांगतात.

आत्मा तर सदैव जन्म-मृत्यूपासून मुक्तच आहे, केवळज्ञान स्वरुपच आहे. केवळ ज्ञाता-दृष्टाच आहे. जन्म-मृत्यू हे आत्म्याला नाहीतच. तरीसुद्धा बुद्धिनेच जन्म-मृत्यूच्या परंपरेचे सर्जन होत राहते, जे मनुष्याला अनुभवात येते. तेव्हा स्वाभाविकपणे मूळ प्रश्न समोर येतो की जन्म-मृत्यू कोणत्या प्रकारे होत असतात? त्यावेळेस आत्मा आणि त्या सोबत कोणकोणत्या वस्तू असतात? त्या सगळयांचे काय होते? पुनर्जन्म कोणाचा होतो? कसा होतो? आवागमन कोणाचे असते? कार्यामधून कारण आणि कारणांमधून कार्याची परंपरा यांचे सर्जन कसे होते? ते कसे काय थांबू शकेल? आयुष्याचे बंध कोणात्या प्रकारे पडतात? आयुष्य कोणत्या आधारावर निश्चित होते? अशा सनातन प्रश्नांची अचूक-समाधानकारक, वैज्ञानिक उत्तरे ज्ञानीपुरुषांशिवाय कोण देऊ शकणार?

आणि त्याहीपुढे, गतीमध्ये प्रवेश करण्याचे कायदे कोणते असतीत? आत्महत्येचे कारण आणि परिणाम काय? प्रेतयोनी काय असते? भूतयोनी आहे का? क्षेत्र परिवर्तनाचे नियम कोणते? भिन्न-भिन्न गतींचा आधार काय? गतीमधून मुक्ती कशी मिळते? मोक्षगती प्राप्त करणारा आत्मा कोठे जातो? सिद्धगती काय आहे? या सगळ्यागोष्टी येथे स्पष्ट होतात.

आत्मस्वरुप आणि अहंकार-स्वरुपाची सूक्ष्म समज ज्ञानींशिवाय कोणीच समजावू शकत नाही!

मृत्यूनंतर परत मरावे लागणार नाही, परत जन्म घ्यावा लागणार नाही, अशी दशा प्राप्त करण्यासंबंधी सगळी स्पष्टता, येथे सूक्ष्मरूपाने संकलित झालेली आहे, जी वाचकांसाठी संसार व्यवहार आणि आध्यात्मिक प्रगतिसाठी हितकारी ठरेल.

**- डॉ. नीरूबहन अमीन**

# मृत्यूवेळी, आधी आणि नंतर

## मुक्ती, जन्म-मरणापासून

**प्रश्नकर्ता :** जन्म-मरणाच्या कटकटीतून कसे सुटायचे?

**दादाश्री :** खूप छान विचारलेत. काय नाव आहे तुमचे?

**प्रश्नकर्ता :** चंदुभाऊ.

**दादाश्री :** खरोखर तुम्ही चंदुभाऊ आहात?

**प्रश्नकर्ता :** हो.

**दादाश्री :** चंदुभाऊ तर तुमचे नाव आहे, नाही का?

**प्रश्नकर्ता :** हो.

**दादाश्री :** मग तुम्ही कोण? तुमचे नाव चंदुभाऊ आहे, हे तर आम्हा सगळ्यांना कबूल आहे, परंतु तुम्ही कोण?

**प्रश्नकर्ता :** ते जाणून घ्यायलाच मी आलो आहे.

**दादाश्री :** ते जाणून घ्याल, तेव्हा जन्म-मरणाच्या कटकटीतून सुटका होईल.

सध्या तर मूळ चंदुभाऊच्या (वाचकांनी चंदुभाऊच्या जागी स्वत:चे नाव समजावे) नावावरच हे सर्व चालले आहे ना? सर्वच चंदुभाऊच्या नावावर?! अरे, हा तर धोका होईल? थोडे तरी स्वत:जवळ ठेवायला हवे होते ना?

तिरडी म्हणजे निसर्गाची जप्ती! कसली जप्ती? तर म्हणतात, नावावर जो बँक बँलन्स होता तो जप्त झाला, मुले जप्त झाली, बंगला जप्त झाला, हे कपडे जे नावावर होते तेही जप्त झाले. सर्व काही जप्तीत गेले. तेव्हा विचारतो, 'साहेब, आता मला तिथे सोबत काय घेऊन जायचे?' तर, 'लोकांबरोबर जेवढे गुंते निर्माण केले आहेत, तेवढेच सोबत घेऊन जा.' म्हणजे या नावावर जे आहे ते सगळे जप्तीमध्ये जाणार आहे, म्हणून आपल्याला स्वत:साठी काही तरी करायला पाहिजे ना? नको का करायला?

## पाठवा, पुढच्या जन्माची गाठोडी

जे आपले नातेवाईक नाहीत, अशा परक्या लोकांना काही सुख दिले असेल, त्यांच्या कामासाठी फेऱ्या मारल्या असतील, त्यांना दुसरी काहीही मदत केली असेल, तर ती 'तिथे' पोहोचते. नातेवाईकांसाठी नाही, परंतु परक्यांसाठी. मग येथे लोकांना औषधासाठी दान दिले असेल, औषधदान किंवा आहारदान दिले असेल, नंतर ज्ञानदान दिले असेल आणि अभयदान, हे सगळे दिले असेल तर ते सर्व तिथे सोबत येईल. तुम्ही असे काही (दान) देता की नाही? की सर्व स्वत:च खाऊन टाकता?

जर सोबत घेऊन जाता आले असते तर इथे असेही लोक आहेत की जे की तीन लाखांचे कर्ज करून जातील. धन्य आहे ना? हे जग असेच आहे, म्हणून सोबत घेऊन जाता येत नाही हेच चांगले आहे.

## मायेची करामत

जन्म माया निर्माण करते, लग्न माया निर्माण करते आणि मृत्यू हे सुद्धा मायाच निर्माण करते. पसंत असो किंवा नसो, पण सुटकाच नाही. परंतु खरी गोष्ट अशी आहे की मायेचे साम्राज्य नाही. मालक तुम्हीच आहात. अर्थात तुमच्या इच्छेनुसारच होत आहे. मागील जन्मी तुमची जी इच्छा होती, त्याचा हिशोब निघाला आणि त्यानुसार माया चालवत आहे. मग आता आरडाओरड करून चालणार नाही. तुम्हीच मायेला सांगितले होते की हा माझा ताळेबंद हिशोब (लेखा-जोखा) आहे.

## आयुष्य एक तुरुंग

**प्रश्नकर्ता :** आपल्या मते आयुष्य काय आहे?

**दादाश्री :** माझ्या मते आयुष्य, हा एक तुरुंग आहे, तुरुंग! चार प्रकारचे तुरुंग आहेत.

एकात नजरकैद आहे. देवलोक नजरकैदेत आहेत. हे मनुष्य दुसऱ्या साध्या कैदेत आहेत. जनावरे तिसऱ्या सक्त मजुरीवाल्या कैदेत आहेत आणि नरकातील जीव चौथ्या जन्मठेपेच्या कैदेत आहेत.

## जन्मापासून चालूच आहे करवत

हे शरीर शुद्धा प्रत्येक क्षणी मरत आहे, पण लोकांना काय त्याची जाणीव आहे? आपले लोक तर, लाकडाचे दोन तुकडे झाले आणि खाली पडले, तेव्हा म्हणतील, 'कापले गेले' अरे, हे तर कापलेच जात होते. करवत चालूच होती.

## मृत्यूचे भय

निरंतर भय वाटेल असे हे जग आहे. एका क्षणासाठी देखील

निर्भयता या जगात नाही, आणि जी निर्भयता वाटते, ती केवळ त्याच्या मूर्छीत अवस्थेमुळे वाटते. उघड्या डोळ्यांनी झोपलेले आहेत, म्हणून हे सगळे चालले आहे.

**प्रश्नकर्ता :** असे म्हटले जाते की आत्मा मरत नाही, तो तर जिवंतच असतो.

**दादाश्री :** आत्मा मरतच नाही, परंतु जोपर्यंत तुम्ही आत्मस्वरूप झाले नाहीत, तोपर्यंत तुम्हाला भीती वाटत राहते ना? मरणाची भीती वाटते ना? आता जर शरीरात काही आजारपण आले तर 'जावे लागेल, मरावे लागेल' अशी भीती वाटते. देहदृष्टी नसेल, तर स्वतः मरत नाही. परंतु इथे तर 'मीच आहे, हाच मी आहे,' अशी तुम्हाला शंभर टक्के खात्री वाटते. तुम्हाला हा चंदुलाल तो मीच आहे, अशी शंभर टक्के खात्री आहे ना?

## यमराज की नियमराज?

या हिंदुस्तानातील सर्व गैरसमज मला काढून टाकायचे आहेत. संपूर्ण देश बिचारा या संशयामुळे सैरभैर झाला आहे. म्हणूनच यमराज नावाचा असा कोणीही जंतू नाही, असे मी पूर्ण गॅरंटी सांगत आहे. तेव्हा कोणी विचारेल, 'मग काय असेल? काही तरी असेलच ना?' तेव्हा मी सांगेन, 'नियमराज आहे!' हे मी पाहून सांगतो. मी काही वाचलेले बोलत नाही. हे सर्व मी माझ्या दर्शनाने पाहून, या डोळ्यांनी नाही, माझे जे दर्शन आहे, त्याने दर्शनाने पाहून मी हे सर्व सांगत आहे.

## मृत्यूनंतर काय?

**प्रश्नकर्ता :** मृत्यूनंतर कोणती गती मिळेल?

**दादाश्री :** संपूर्ण आयुष्यात जी कार्ये केली असतील, आयुष्यभर

जे धंदे चालवले असतील, केले असतील, त्याचा ताळेबंद हिशोब मरणाच्या वेळी निघतो. मरण्याच्या एक तास आधी ताळेबंद हिशोब समोर येतो. येथे ज्यांनी ज्यांनी बिनहक्काचे हिसकावले असेल, पैसे हिसकावले असतील, बायका पळवल्या असतील, बुद्धीने किंवा वाटेल त्या मार्गाने अशा गोष्टी बळकावल्या असतील, त्या सगळ्यांना जनावर गती प्राप्त होते आणि जर आयुष्यभर सज्जनता राखली असेल तर मनुष्यगती प्राप्त होते. मरणोपरांत चार प्रकारच्या गती असतात. जे आपल्या स्वार्थासाठी साऱ्या गावाचे पीक जाळून टाकतात, असे असतात ना काही इथे? त्यांना शेवटी नरकगती मिळते. अपकारासमोर देखील उपकार करतात, असे लोक सुपर ह्युमन असतात, ते मग देवगतीत जातात.

## योग उपयोग परोपकाराय

मन-वचन-काया आणि आत्म्याचा उपयोग लोकांसाठी कर. तुझ्या स्वत:साठी करशील तर रायणी(झाडाचे नाव) चा जन्म मिळेल. मग पाचशे वर्ष भोगतच रहा. मग लोक तुझी फळे खातील. लाकडे जाळतील. लोकांद्वारे तुझा कैद्यासारखा उपयोग करून घेतला जाईल. म्हणून भगवंत म्हणतात की, तुझे मन-वचन-काया आणि आत्म्याचा उपयोग दुसऱ्यांसाठी कर, आणि मग तुला जर कोणतेही दु:ख आले तर मला सांग.

## आणखी कुठे जाणार?

**प्रश्नकर्ता :** देह सुटल्यानंतर परत यावे लागते का?

**दादाश्री :** दुसरे कुठेच जायचे नाही. इथल्या इथेच, तुमच्या आजूबाजूला जे गाय-बैल बांधलेले असतात, जे कुत्रे जवळपास राहत असतात ना, तुमच्या हातांनीच खातात, पितात, तुमच्या समोरच बघत असतात, तुम्हाला ओळखतात, ते सर्व तुमचेच मामा आहेत, काका

आहेत, ते सगळे इथल्या इथेच असतात. म्हणून त्यांना मारू नका. खायला द्या. ते तुमच्या जवळचेच नातेवाईक आहेत. तुम्हाला चाटायला सुद्धा येतात, बैल सुद्धा चाटतात.

## रिटर्न तिकीट

**प्रश्नकर्ता :** गायी-म्हशींचा जन्म मध्येच का मिळतो?

**दादाश्री :** हे तर अनंत जन्मांपासून चालले आहे, हे लोक सगळे आले आहेत, ते सर्व गायी-म्हशीमधूनच आले आहेत. आणि इथून जे जाणार आहेत, त्यातील पंधरा टक्के सोडून बाकी सगळे तिथले रिटर्न तिकीट घेऊन आले आहेत. कोण-कोण तेथील तिकीट घेऊन आले आहेत? तर जे भेसळ करतात, जे बिनहक्काचे बळकावतात, बिनहक्काचे उपभोगतात, जिथे बिनहक्काचे असेल तिथे जनावराचा जन्म मिळतो.

## मागील जन्मांची विस्मृती

**प्रश्नकर्ता :** आम्हाला आमचा मागील जन्म का आठवत नाही? आणि समजा आठवला तर काय होईल?

**दादाश्री :** तो कोणाला आठवेल की ज्याला मरतेवेळी जरा सुद्धा दु:ख झाले नसेल आणि ज्याने इथे चांगले आचार-विचार केले असतील, त्याला आठवेल. कारण मातेच्या गर्भात तर अपार दु:ख असते. पण या दु:खासोबत दुसरेही दु:ख असते, मृत्यू झाला आहे त्याचेही दु:ख, हे दोन्ही दु:ख असतात. त्या दु:खांमुळे तो बेभान होऊन जातो, म्हणून त्याला आठवत नाही.

## अंतकाळी गाठोडी गोळा कर ना...

एक ऐंशी वर्षांचे काका होते, त्यांना दवाखान्यात दाखल केले होते. मला जाणवले की हे आता दोन-चार दिवसात जाणार आहेत

येथून. तरीसुद्धा मला म्हणतात, 'चंदुलाल तर मला येथे भेटायलाही आले नाहीत.' आम्ही सांगितले की, 'चंदुलाल तर आले होते.' तेव्हा म्हणतात, मग त्या नगीनदासचे काय?' अंथरुणावर पडल्या-पडल्या नोंद करत राहतो की कोण-कोण भेटायला आले होते. अरे, स्वतःच्या तब्येतीची काळजी घे ना! दोन-चार दिवसात तर जाणार आहेस. आधी तू तुझी गाठोडी सांभाळ. इथून सोबत घेऊन जायची तुझी गाठोडी तर गोळा कर. नगीनदास नाही आले त्याचे तुला काय करायचे आहे ?

## ताप आला आणि टप्प झाले

म्हातारे काका आजारी होते आणि तुम्ही डॉक्टरांना बोलावले, सगळे इलाज केले पण तरीसुद्धा मृत्यू पावले. नंतर शोक प्रदर्शित करणारे असतात ना, ते आश्वासन द्यायला येतात. मग ते विचारतात, 'काय झाले होते काकांना?' तेव्हा तुम्ही सांगता की, 'खरे तर मलेरियासारखे वाटत होते, पण नंतर डॉक्टरांनी सांगितले की हे तर जरा फ्लूसारखे आहे.' तेव्हा ते विचारतात की, 'कोणत्या डॉक्टरला बोलावले होते?' तुम्ही सांगता, की अमक्याला, त्यावर ते म्हणतील, 'तुम्हाला अक्कल नाही. ह्या नाही, त्या डॉक्टरला बोलावण्याची गरज होती.' नंतर परत दुसरा कोणी येऊन तुम्हाला रागावतो, 'असे करायला हवे होते ना! अशी मूर्खासारखी गोष्ट करायची असते का?' याचा अर्थ पूर्ण दिवस लोक येऊन तुम्हाला दटावतच राहतात. लोक उलट तुम्हालाच दोष देत बसतात. तुमच्या साधेपणाचा फायदा घेतात. म्हणून मी तुम्हाला सांगतो की, लोक जेव्हा दुसऱ्या दिवशी येऊन विचारतील तेव्हा तुम्ही त्यांना काय सांगायचे की, 'भाऊ, काकांना जरा ताप आला आणि टप्प झाले; (मृत्यू पावले). आणखी काहीही झाले नव्हते.' समोरचा विचारेल तेवढेच बोला. तुम्हाला समजायला हवे की विस्ताराने सांगायला गेलात तर कटकट वाढेल, त्यापेक्षा तर रात्री ताप आला

आणि सकाळी टप्प झाले, असे सांगितले की मग कोणतीच कटकट उरत नाही ना!

## स्वजनांचा अंतिमकाळी सांभाळ

**प्रश्नकर्ता :** एकाद्या स्वजनाचा अंतकाळ जवळ आला असेल तर त्याच्याशी जवळच्या नातेवाईकांची वागणूक कशी असायला हवी?

**दादाश्री :** ज्यांचा अंतिमकाळ जवळ आला असेल, त्यांना तर अतिशय चांगल्याप्रकारे सांभाळायला हवे. त्यांचा प्रत्येक शब्द सांभाळायला हवा. त्यांना नाराज करू नये. सगळ्यांनी त्यांना खूश ठेवायला हवे, ते जरी काही उलट बोलले तरीही आपण त्याचा स्वीकार केला पाहिजे की, 'आपले बरोबर आहे!' ते म्हणतील की, दूध द्या, तर लगेचच दूध आणून द्यायचे. ते म्हणतील की, 'हे तर पाण्यासारखे आहे, दुसरे आणा.' तर लगेच दुसरे दूध गरम करून आणून द्यायचे. आणि सांगायचे की, 'हे शुद्ध आणि चांगले आहे.' म्हणजे त्यांना बरे वाटेल असेच केले पाहिजे. असेच सगळे बोलायला हवे.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे त्यात खऱ्या-खोट्याच्या भानगडीत पडू नये?

**दादाश्री :** खरे-खोटे तर या जगात नसतेच. त्यांना बरे वाटले की बस, त्यानुसार सर्व काही करायला हवे. त्यांना बरे वाटेल असेच वर्तन करायला हवे. लहान मुलांसोबत आपण कशाप्रकारे वागतो? मुलाने काचेचा ग्लास फोडला तरी आपण त्याला रागावतो का? दोन वर्षाचा मुलगा असला तर काय त्याला विचारतो की, का फोडलास? किंवा असे-तसे काही बोलतो? मुलांबरोबर जसा व्यवहार करतो, तसाच व्यवहार त्यांच्याबरोबरही करायला हवा.

## अंतिम क्षणी धर्मध्यान

**प्रश्नकर्ता :** अंतिम तासांमध्ये ठराविक लामांकडून काही क्रिया

करून घेतात. असे म्हटले जाते की मनुष्य जेव्हा मृत्यू शय्येवर असतो, तेव्हा तिबेटचे लामा त्याच्या आत्म्याला सांगतात की, तू अशाप्रकारे जा. किंवा आपल्याात जसे गीतापाठ केला जातो किंवा काही चांगले शब्द त्याला ऐकवतात त्यामुळे त्यांच्यावर अंतिम तासांमध्ये काही परिणाम होतो का?

**दादाश्री :** काहीसुद्धा होत नाही. तुम्ही बारा महिन्यांचे वहीखाते लिहिता, त्यात जर धनत्रयोदशीपासून तुम्ही फक्त नफाच जमा करत राहाल आणि तोटा मांडणारच नाही तर चालेल काय?

**प्रश्नकर्ता :** नाही, तसे करता येणार नाही.

**दादाश्री :** असे का?

**प्रश्नकर्ता :** हिशोब तर पूर्ण वर्षाचाच येईल ना.

**दादाश्री :** त्याचप्रमाणे हा देखील संपूर्ण आयुष्याचा ताळेबंद हिशोब समोर येतो. हे तर लोक फसवतात. लोकांना मूर्ख बनवतात.

**प्रश्नकर्ता :** दादाश्री, मनुष्याची अंतिम अवस्था असेल, जागृत अवस्था असेल, अशावेळेस त्याला कोणी गीतेचा पाठ ऐकवेल किंवा दुसऱ्या शास्त्रातील काही ऐकवेल, त्याच्या कानात काही सांगेल........

**दादाश्री :** तो स्वतः सांगत असेल तर, त्याच्या इच्छेनुसार असेल तर म्हणायला पाहिजे.

## मर्सी किलिंग

**प्रश्नकर्ता :** ज्याला अतिशय वेदना होत असेल त्याला वेदना सहन करू द्यायचे, आणि जर त्याला मारून टाकले तर त्याला पुढच्या जन्मात वेदना सहन करण्याचे बाकी राहील, असे म्हटले जाते ही गोष्ट

मला योग्य वाटत नाही. तो अतिशय वेदनेत असेल तर त्याचा अंत आणायलाच पाहिजे, त्यात काय चुकीचे आहे?

**दादाश्री :** असा अधिकार कोणालाही नाही. आम्हाला इलाज करण्याचा अधिकार आहे, सेवा करण्याचा अधिकार आहे, परंतु कोणालाही मारण्याचा अधिकार नाहीच.

**प्रश्नकर्ता :** मग त्यात आपले काय भले झाले?

**दादाश्री :** तर मारण्याने काय भले झाले? तुम्ही जर त्या वेदनेत असलेल्या व्यक्तीला मारून टाकले तर तुमचे मनुष्यत्व निघून जाईल, आणि ही पद्धत मानवतेच्या सिद्धांताविरुद्ध आहे, मानवतेच्या विरुद्ध आहे.

## सोबत, स्मशानापर्यंतच

ही उशी असते, तिचे अभ्रे (कवर) बदलत राहतात, परंतु उशी तर तीच असते. अभ्रे फाटून जातात आणि बदलत राहतात, तसेच हा अभ्रा सुद्धा बदलत राहतो.

बाकी, हे जग सारे पोलंपोल आहे. तरी पण व्यवहाराने बोललो नाही तर समोरच्याच्या मनाला दुःख होते. परंतु स्मशानात सोबत जाऊन तिथे चितेत कोणी उडी घेत नाही. घरातील सगळेच परत येतात. सगळेच हुशार आहेत, समजदार आहेत. त्याची आई सुद्धा रडत-रडत परत येते.

**प्रश्नकर्ता :** मग त्याच्या नावाने छाती बडवतात की मागे काहीच ठेवून गेले नाहीत, आणि जर दोन लाख ठेवले असतील तर काहीच बोलत नाहीत.

**दादाश्री :** होय, बरोबर आहे. हे तर मागे काही ठेवून गेला

नाही त्याचे रडणे आहे. 'मरून गेला आणि मारून गेला' असे सुद्धा आतल्या आत बोलत राहतात. 'काहीच ठेवले नाही आणि आम्हाला मारून गेला,' आता तो काही ठेवून गेला नाही, त्यात त्या बाईचे नशीब खोटे म्हणून ठेवले नाही. पण जो मरतो त्याचा नशीबी शिव्या खाणे लिहिलेले होते, म्हणून तो खातो. भरपूर शिव्या देतात!

आपले लोक जे मृतकाबरोबर स्मशानात जातात, ते मग परत येत नाहीत ना, की सगळे परत येतात? म्हणजे ही तर एक प्रकारची फजिती आहे! रडले तरी दु:ख आणि नाही रडले तरी दु:ख. खूप रडले तर लोक म्हणणार की, 'इतरांकडे कोणी मरत नाही का, की तुम्ही इतके रडत आहात? घनचक्कर आहात की काय?' आणि नाही रडले तर म्हणणार की, 'तुम्ही तर दगड आहात.' दगडासारखे हृदय आहे तुमचे.' म्हणजे काय करावे हीच समस्या आहे. सर्व काही पद्धतशीर असायला हवे, असे म्हणतील.

तिथे स्मशानात जाळणारही आणि सोबत जवळच्या हॉटेलमध्ये बसून चहा-नाश्ताही करणार, नाश्ता करतात ना लोक?

**प्रश्नकर्ता :** अहो, नाश्ता सोबतच घेऊन जातात!

**दादाश्री :** असे होय! काय सांगता? म्हणजे, असे आहे हे जग. अशा जगात कसे जगायचे?

येण्या-जाण्यापुरता संबंध ठेवतात, पण स्वत:वर जबाबदारी घेत नाहीत. तुम्ही घेता का जबाबदारी? स्वत:वर घेता? पत्नी किंवा अन्य कोणाचीही नाही?

**प्रश्नकर्ता :** नाही.

**दादाश्री :** काय सांगता? आणि तो तर अजून बायकोला शेजारी

बसवून ठेवतो. म्हणतो की, तुझ्याशिवाय मला करमत नाही. परंतु स्मशानात सोबत मात्र कोणीच जात नाही. जातो का कोणी?

## मृत्यूतिथीच्या वेळी

**प्रश्नकर्ता :** कुटुंबात कोणाची तिथी आली की त्या दिवशी कुटुंबीयांनी काय करायला हवे.

**दादाश्री :** परमेश्वराला प्रार्थना करायला हवी की त्यांचे भले होवो.

## नंतर कुठे गेले ते कळतच नाही

**प्रश्नकर्ता :** कोणाचे निधन झाले असेल, आणि आम्हाला जर हे जाणून घ्यायचे असेल की ती व्यक्ती आता कुठे आहे, तर ते कसे कळेल?

**दादाश्री :** ते तर ठराविक ज्ञानाशिवाय कळणार नाही ना! त्यासाठी ठराविक ज्ञान हवे, आणि ते जाणून घेऊनही त्याचा काही उपयोग नाही, परंतु आपण त्यांच्यासाठी भावना केली तर ती भावना मात्र पोहोचते. आपण आठवण काढली, भावना केली तर ती पोहोचते. खरे तर, ज्ञानाशिवाय दुसरे काहीच माहीत पडत नाही!

तुम्हाला कोणाची तरी माहिती काढायची आहे का? तुमचे कोणी नातेवाईक गेलेत का?

**प्रश्नकर्ता :** माझा सख्खा भाऊ आत्ताच मृत्यू पावला.

**दादाश्री :** तो तुमची आठवण काढत नाही आणि तुम्ही त्याला आठवत राहता? हे मृत्यू होणे याचा अर्थ काय आहे, हे तुम्ही समजता का? याचा अर्थ वहीखात्याचा हिशोब पूर्ण होणे, हा आहे. म्हणून तुम्ही काय करायचे, की जर तुम्हाला त्याची खूप आठवण येत असेल तर वीतराग भगवंतांना सांगायचे की त्याला शांती द्या.

आठवण येते, म्हणून त्याला शांती मिळावी असे म्हणायचे. दुसरे आपण काय करू शकतो?

## अल्लाहची अमानत

तुम्हाला जे विचारायचे असेल ते विचारा. अल्लाजवळ जाण्यासाठी ज्या काही अडचणी येतात, त्या आम्हाला विचारा, आम्ही त्या दूर करून देऊ.

**प्रश्नकर्ता :** माझ्या मुलाचे अपघातात निधन झाले, तर त्या दुर्घटनेचे कारण काय असेल?

**दादाश्री :** या जगात जे काही डोळ्यांनी दिसते, कानांनी ऐकायला येते, ते सारे 'रिलेटिव्ह करेक्ट' (व्यवहार सत्य) आहे. अगदी खरी गोष्ट नाही ही. हे शरीरही आपले नाही, तर मुलगा आपला कसा असू शकतो? हे तर व्यवहाराने, लौकिकव्यवहाराने आपला मुलगा मानतात. वास्तवात तो आपला मुलगा नसतोच. खरे तर, हे शरीर सुद्धा आपले नसते. म्हणजे जे आपल्या जवळ आहे तेवढेच आपले आणि दुसरे सारे परके आहे! म्हणून मुलाला जर आपला मुलगा मानत राहाल तर उपाधी होईल आणि अशांती वाटेल. तो मुलगा तर आता गेला. खुदाची अशीच मर्जी आहे, तर त्याला आता 'लेट गो' करा (ती गोष्ट आता विसरून जा).

**प्रश्नकर्ता :** ते तर ठीक आहे, अल्लाहची अमानत आमच्याजवळ होती, ती घेतली.

**दादाश्री :** हो, बस. हा सारा बाग अल्लाहचाच आहे.

**प्रश्नकर्ता :** त्याचा अशाप्रकारे मृत्यू झाला, तर ते आमचे कुकर्म असेल?

**दादाश्री :** हो. मुलाचेही कुकर्म आणि तुमचेही कुकर्म. चांगले कर्म असते तर चांगलेच झाले असते.

## पोहोचतात मात्र भावस्पंदन

मुलांच्या मृत्यूनंतर त्यांच्यासाठी चिंता केल्याने त्यांना दुःख होते. आपले लोक अज्ञानतेमुळे असे सर्व करतात, म्हणून आपल्याला जसे आहे तसे समजून, शांत राहिले पाहिजे. विनाकारण डोकेफोड कराल, त्याला काय अर्थ आहे? सगळ्या ठिकाणी, कोणीही असे नाही की ज्यांच्या मुलांनी या जगाचा निरोप घेतलेला नाही. हे तर केवळ संसारिक ऋणानुबंध आहेत, देण्या-घेण्याचा हिशोब आहे. आम्हाला सुद्धा मुलगा-मुलगी होते. परंतु तेही वारले. पाहुणे आले होते, ते पाहुणे निघून गेले. त्या आपल्या मालकीच्या गोष्टी कुठे होत्या? आणि आपल्याला सुद्धा नाही का जायचे? आपल्यालाही तिथेच जायचे आहे, मग हे सर्व काय चालवले आहे? त्यापेक्षा जे जिवंत आहेत त्यांना शांती द्या. गेले ते गेले, त्यांना आठवायचे सोडून द्या. इथे जे जिवंत आहेत, आश्रित आहेत त्यांना शांती द्या, इतकेच आपले कर्तव्य. हे तर गेलेल्यांना आठवत राहतात आणि जे आहेत त्यांना शांती देऊ शकत नाहीत, असे कसे? याचा अर्थ, तुम्ही तुमचे कर्तव्य चुकत आहात. असे तुम्हाला नाही का वाटत? गेले ते गेले. खिशातून लाख रूपये खाली पडले आणि परत सापडले नाही तर आपण काय करायला हवे? डोके फोडायला हवे?

हा आपल्या हातचा खेळ नाही आणि त्या बिचाऱ्याला तिथे दुःख होते. आपण इथे दुःखी होतो, याचा परिणाम त्याच्यावर होतो. त्यालाही सुखी होऊ देत नाही आणि आपणही सुखी होत नाही. म्हणून शास्त्रकारांनी सांगितले आहे की, 'गेल्यानंतर उपाधी करू नका' म्हणून आपल्या लोकांनी काय केले की, 'गरुड पुराण करा, अमके करा, पूजा करा आणि मनातून काढून टाका.' आपण असे काही केले होते? तरीही विसरलात, नाही का?

**प्रश्नकर्ता :** परंतु त्याला विसरू शकत नाही, वडीलांचे व मुलाचे संबंध खूप चांगले होते. म्हणून त्याला विसरू शकत नाही.

**दादाश्री :** हो, विसरू शकू असे नाही. परंतु आपण जर विसरलो नाही, तर आपल्याला दु:ख होते आणि त्यालाही तिथे दु:ख होते. आपल्या मनात त्याच्यासाठी दु:ख बाळगणे, ते वडील या नात्याने आपल्या कामाचे नाही.

**प्रश्नकर्ता :** त्याला कशाप्रकारे दु:ख होते?

**दादाश्री :** आपण इथे दु:खी आहोत, त्याचा परिणाम तिथे झाल्याशिवाय राहत नाही. या जगात तर सर्व फोनसारखे आहे, टेलीविजनसारखे आहे हे जग! आणि आपण इथे उपाधी केली तर तो परत येणार आहे का?

**प्रश्नकर्ता :** नाही.

**दादाश्री :** काही केल्या परत येणार नाही?

**प्रश्नकर्ता :** नाही.

**दादाश्री :** उपाधी कराल तर ती त्याला पोहोचते आणि त्याच्या नावावर आपण धर्म-भक्ती करू, तरीही आपली भावना त्याच्यापर्यंत पोहोचते, आणि त्याला शांती राहते. त्याला शांती देण्याची गोष्ट आपल्याला कशी वाटते? त्याला शांती मिळावी हे आपले कर्तव्यच आहे ना? म्हणून असे काही करा की त्याला चांगले वाटेल. एखाद्या दिवशी शाळेतील मुलांना पेढे खाऊ घाला, असे काही तरी करा.

म्हणजे जेव्हा तुम्हाला मुलाची आठवण येईल, तेव्हा त्याच्या आत्म्याचे कल्याण होवो, असे बोला. 'कृपाळूदेवाचे' नाव घ्याल, 'दादा भगवान' बोलाल तरीही काम होईल. कारण 'दादा भगवान' आणि 'कृपाळूदेव' आत्मस्वरुपाने एकच आहेत! देहाने वेगळे दिसतात. डोळ्यांनी वेगळे दिसतात परंतु वस्तुतः एकच आहेत, मग महावीर भगवानांचे नाव घेतले तरी एकच गोष्ट आहे. त्यांच्या आत्म्याचे कल्याण

होवो, हीच भावना तुम्हाला निरंतर करायची आहे. तुम्ही नेहमी त्याच्या सोबत राहिलात, सोबत खाणे-पिणे केलेत, म्हणून आता फक्त कल्याण कसे होईल, अशीच भावना करायला हवी. आपण परक्यांसाठी चांगली भावना करतो, मग हा तर आपला स्वजन आहे, त्याच्यासाठी का नाही करावी?

## रडणे, स्वतःसाठी की जाणाऱ्यासाठी?

**प्रश्नकर्ता :** आपल्यात पुनर्जन्माची संकल्यना आहे, तरी पण घरात कोणाचे निधन झाल्यावर लोक का रडतात?

**दादाश्री :** ते तर आपल्या स्वार्थासाठी रडतात. खूपच जवळचे नातेवाईक असतील तर ते खरंच रडतात, पण दुसरे सगळे जे रडतात ना, ते स्वतःच्या नातेवाईकांना आठवून रडतात, हेही आश्चर्यच आहे ना? हे लोक भूतकाळाला वर्तमानकाळात आणतात. हे भारतीय सुद्धा धन्य आहेत! भूतकाळाला वर्तमानकाळात आणतात आणि तो प्रयोग आपल्याला दाखवतात.

## परिणाम कल्पांताचा

एकदा कल्पांत केला तर 'कल्पाच्या'च्या अंतापर्यंत भटकावे लागेल. एक पूर्ण कल्पाच्या अंतापर्यंत भटकण्याचे झाले हे!

## हे 'लीकेज' करू नये

**प्रश्नकर्ता :** नरसिंह मेहतांनी त्यांच्या पत्नीचे निधन झाले त्यावेळी 'भलु थयु भांगी जंजाळ' (चांगले झाले सुटले जंजाळ) असे म्हटले, ते योग्य आहे का?

**दादाश्री :** परंतु ते खुळ्यासारखे (आनंदाने वेडे होऊन) बोलून गेले की 'भलु थयु भांगी जंजाळ.' ही गोष्ट तर मनातच ठेवायची होती

की 'जंजाळ सुटले.' ते मनातून 'लीकेज' व्हायला नको होते पण हे तर मनातून 'लीकेज' होऊन बाहेर निघाले. मनात ठेवायची गोष्ट जाहीर करणाऱ्या मनुष्याला खुळे म्हटले जाते.

## ज्ञानी असतात खूप विवेकी

आणि 'ज्ञानी' वेडे-खुळे नसतात. ज्ञानी खूप समंजस असतात. त्यांना मनातून असे वाटते की, 'बरे झाले सुटले जंजाळ' परंतु बाहेर काय म्हणतात? अरेरे, खूप वाईट झाले. आता मी एकटा काय करणार? असे देखील म्हणतात. नाटक करतात! हे जग स्वयं एक नाटकच आहे, म्हणून आतून जाणा की, 'बरे झाले सुटले जंजाळ,' पण बाहेर विवेकात राहिले पाहिजे. 'भलं झाले सुटले जंजाळ, सुखाने भजूया श्री गोपाळ' असे उघड बोलू नये. असा अविवेक तर कोणी बाहेरचाही करत नाही. दुश्मन असला, तरीही तो विवेकपूर्वक बसतो. तोंड शोकग्रस्त करून बसतो. आम्हाला दु:ख किंवा असे दुसरे काहीही होत नाही, पण तरीही बाथरुममध्ये जाऊन तोंडाला पाणी लावून मग येऊन बसतो आरामात. हा अभिनय आहे. दी वर्ल्ड इज दी ड्रामा इटसेल्फ,(जग स्वयं एक नाटक आहे.) तुम्हाला नाटकच करायचे आहे, केवळ अभिनयच करायचा आहे, परंतु अभिनय 'सिन्सिअरली' करायचा.

## जीव खरेच भटकतो का तेरा दिवस?

**प्रश्नकर्ता :** मृत्यूनंतर तेरा दिवसांचा रेस्टहाऊस असतो, असे म्हटले जाते.

**दादाश्री :** तेरा दिवसांचे तर या ब्राह्मणांचे असते, मरणाऱ्याला त्याचे काय? हे ब्राह्मण असे म्हणतात की, रेस्टहाऊस आहे. मेल्यानंतर अंगठ्याइतका होऊन घरावर बसून राहील आणि बघत राहील, अरे मूर्खा कशासाठी बघत राहिल? पण त्याची दहशत बघा केवढी! अंगठ्याएवढाच

आहे असे म्हणतात. आणि घरच्या कौलांवर जाऊन बसतो, असे म्हणतात! आणि आपले लोक हे खरेही मानतात. हे जर खरे मानले नसते तर तेरावे केलेच नसते या लोकांनी. तेरावे करण्याच्या फंदातच लोक पडले नसते.

**प्रश्नकर्ता :** गरूड पुराणात लिहिले आहे की अंगठ्याएवढाच आत्मा आहे.

**दादाश्री :** हो, त्याचे नावच गरुड पुराण आहे ना, पुराणे (जुने) म्हटले जाते. म्हणे अंगठ्याएवढाच आत्मा, म्हणून तर खरी गोष्ट समजत नाही ना, दिवस बदलतच नाही, रोजच शुक्रवार! करायला गेले सायन्टिफिक, हेतू सायन्टिफिक होता परंतु थिंकिंग (विचारसरणी) सगळे बिघडून गेले. हे लोक त्याच्या नावावर क्रिया करतात आणि क्रिया करण्याआधी ब्राह्मणांना दान देतात. तेव्हा दान देण्यायोग्यच ब्राह्मण होते, त्या ब्राह्मणांना दान दिल्यावर पुण्य घडत होते. आता तर सगळे विचित्र झाले आहे. ब्राह्मण इथून दान दिलेला पलंग घेऊन जातो, त्या पलंगाचा सौदा आधीच झालेला असतो. की हा पलंग दोनशे रुपयात अमक्यात देईन. गादीचा सौदा पण तसाच केलेला असतो, चादरीचाही सौदा केलेला असतो. आपण जे कपडे, वस्तू वगैरे सर्व देतो ते सुद्धा ते ब्राह्मण विकून टाकतात. मग हे सर्व त्या आत्म्यापर्यंत पोहोचेल, असे कसे मानून घेतले लोकांनी?

**प्रश्नकर्ता :** दादाजी, आता तर कित्येक लोक ब्राह्मणांना सांगतात की, तुम्हीच सगळे आणा, आम्ही ठराविक पैसे देऊ.

**दादाश्री :**असे आजच नाही, बऱ्याच वर्षांपासून करत आहेत, ठराविक पैसे देऊ, तू घेऊन ये. आणि तो दुसऱ्याने दिलेली खाट घेऊन येतो! आता बोला! तरीही लोकांना हे चुकीचे आहे असे वाटतच नाही, आणि ही गाडी जशीच्यातशी चालूच राहते. जैन लोक असे करत

नाहीत. जैन फार हुशार असतात. म्हणून ते असे-तसे काही करत नाहीत. असे-तसे काही नसतेच. इथून आत्मा निघाला की सरळ त्याच्या गतीमध्ये जातो, योनी प्राप्त होऊनच जाते.

## मरणाऱ्याला काहीच देणेघेणे नाही

**प्रश्नकर्ता :** मरणाऱ्याच्या मागे भजन-कीर्तन करायचे की नाही? असे केल्याने काय फायदा होतो?

**दादाश्री :** मरणाऱ्या व्यक्तीला त्याच्याशी काहीच देणेघेणे नाही.

**प्रश्नकर्ता :** मग हे जे आपले धार्मिक विधी आहेत, मृत्यूनंतर जे काही विधी केले जातात, ते बरोबर आहेत की नाहीत?

**दादाश्री :** यामधील एक अक्षर देखील खरे नाही. गेले ते गेले. लोक हे आपल्याआपणच करतात आणि समजा त्यांना जर असे सांगितले की तुम्ही स्वत:साठी करा, तर म्हणतात, 'नाही भाऊ, वेळच नाही मला.' आणि वडिलांसाठी करायला सांगितले, तरी पण करणार नाहीत, असेही लोक आहेत. पण शेजारी म्हणतात की, 'अरे मेल्या, तुझ्या वडिलांचे कर ना, तुझ्या वडिलांचे कर.' शेजारचे जबरदस्तीने त्याला करायला लावतात.

**प्रश्नकर्ता :** मग हे गरुड पुराण बसवतात, ते काय आहे?

**दादाश्री :** गरुड पुराण तर, जे लोक रडत राहतात ना, ते या गरुड पुराणात जातात, म्हणजे फक्त शांती मिळवण्यासाठी हे सगळे उपाय आहेत.

## हे सर्व वाह-वाहसाठी

**प्रश्नकर्ता :** मृत्यूनंतर बारवे-तेरावे करतात, भांडी वगैरे वाटतात, भोजन ठेवतात, त्याचे महत्व किती आहे?

**दादाश्री :** या गोष्टी अनिवार्य नाहीत. ते तर मागे वाह-वाह मिळवण्यासाठी करतात. आणि समजा खर्च केला नाही तर लोभी बनतो. कुणी दोन हजार रुपये दिले असतील तर खात-पित नाही आणि दोन हजारामागे पैसे जोडत राहतो. म्हणून असा खर्च केला की मन शुद्ध होते आणि लोभही वाढत नाही. परंतु ती अनिवार्य गोष्ट नाही. जवळ असेल तर करा, नाही तर काही हरकत नाही.

## श्राद्धाची खरी समज

**प्रश्नकर्ता :** या श्राद्धामध्ये पितरांना आव्हान केले जाते, ते योग्य आहे? श्राद्ध पक्षाच्यावेळी पितर येतात का? आणि कावळ्याला भोजन (कागवास) देतात, ते काय आहे?

**दादाश्री :** त्याचे असे आहे की, जर मुलासोबत संबंध असेल तर तो येईल ना. सर्व संबंध पूर्ण होतो तेव्हाच तर देह सुटतो. घरच्यांशी कोणत्याही प्रकारचा संबंध उरला नाही, म्हणून हा देह सुटतो. नंतर कोणी भेटत नाही. नंतर पुन्हा जर नवीन संबंध बांधला गेला असेल तर परत तिथे जन्म होतो. बाकी कोणी येत नाही. पितर कोणाला म्हणणार? मुलाला म्हणणार की बापाला म्हणणार? मुलगाही पितर होणार आहे आणि बापही पितर होणार आहे, आजोबाही पितर होणार आहेत, मग पितर कोणाला म्हणणार?

**प्रश्नकर्ता :** याचा अर्थ आठवण काढण्यासाठीच या क्रिया केल्या जातात, असेच ना?

**दादाश्री :** नाही, आठवण काढण्यासाठीही नाही. हे तर आपले लोक मृतकाच्या मागे धर्माच्या नावावर चार आणे सुद्धा खर्च करतील असे नाहीत. म्हणून मग त्यांना समजावले की भाऊ, तुमच्या वडिलांचे निधन झाले आहे तर थोडेफार खर्च करा. असे काही करा, तेव्हा

ते तुमच्या वडिलांपर्यंत पोहोचेल. लोक सुद्धा त्याला रागावून सांगतात की बापासाठी काही तरी तर कर ना! श्राद्ध कर! काही चांगले कर! तर असे करून दोनशे-चारशे, जे काही खर्च करायला लावतात, धर्माच्या नावावर, इतकेच त्याचे फळ मिळते. बापाच्या नावावर करतो आणि नंतर त्याचे फळ मिळते. जर वडिलांचे नाव घेतले नसते तर या लोकांनी चार आणे सुद्धा खर्च केले नसते. याचा अर्थ अंधश्रद्धेमुळे हे सगळे चालले आहे, आपल्याला समजले ना? की नाही समजले?

हे व्रत-उपास करतात ते सगळे आयुर्वेदिक आहे. आयुर्वेदात कशा तऱ्हेने फायदा होईल, यासाठी व्रत-उपासाची व्यवस्था केली आहे. पुर्वीच्या लोकांनी चांगली व्यवस्था केली आहे. या मूर्ख लोकांनाही त्यामुळे फायदा होईल, म्हणून अष्टमी, एकादशी, पंचमी, असे सर्व प्रबंध केले आणि परत हे श्राद्धही करतात ना! श्राद्ध, तर खूप चांगल्या हेतुसाठी केले आहे.

**प्रश्नकर्ता :** दादाजी, श्राद्धात कावळ्यांना घास देतात, त्याचे तात्पर्य काय? त्याला अज्ञानता म्हणायचे का?

**दादाश्री :** नाही, अज्ञानता नाही. हे असे सर्व लोकांनी शिकवले आहे की या प्रकारे श्राद्ध कर्म होतात. आपल्या येथे तर श्राद्ध करण्याचा मोठा इतिहास आहे. त्याचे काय कारण होते? श्राद्ध केव्हापासून सुरू होतात? तर भाद्रपद शुक्ल पौर्णिमेपासून ते भाद्रपद कृष्ण अमावस्येपर्यंत, श्राद्धपक्ष म्हणतात. सोळा दिवसांचे श्राद्ध. आता ही श्राद्धाची परंपरा लोकांनी का सुरू केली? खूप बुद्धिमान प्रजा आहे. श्राद्ध जे शद्म केले आहे, ती तर सर्व वैज्ञानिक पद्धत आहे. आपल्या भारतात आजपासून काही वर्षांपूर्वी गावांमध्ये प्रत्येक घरांमध्ये एक खाट टाकलेली असायची. मलेरिया झालेली एक-दोन माणसे खाटेवर झोपलेली असायचीच. कोणत्या महिन्यात? तर भाद्रपद महिन्यात. आम्ही गावात

जात असू तर प्रत्येक घराबाहेर एखादी खाट पडलेली असायची आणि त्यावर आजारी माणूस चादर ओढून झोपलेला असायचा. ताप होता, मलेरियाच्या तापाने पिडित रोगी. भाद्रपद महिन्यात मच्छर खूप असायचे, म्हणून मलेरिया खूप पसरत होता. मलेरिया हा पित्ताचा ज्वर म्हटला जातो. तो वायू अथवा कफाचा ज्वर नाही. पित्ताचा ज्वर, त्यामुळे इतके अधिक पित्त वाढत होते. पावसाचे दिवस आणि पित्त ज्वर आणि त्यावर मच्छर चावतात. ज्याला जास्त पित्त असते त्याला चावतात. म्हणून माणसांनी, या शोधकर्त्यांनी हे शोधले होते की, या हिंदुस्तानात काही तरी मार्ग शोधून काढा. नाही तर जनसंख्या अर्धी होऊन जाईल. आता तर मच्छर कमी झाले आहेत, नाही तर मनुष्य जिवंत राहिला नसता. म्हणजे या पित्ताच्या तापाचे शमन करण्यासाठी, अशी शमन क्रिया करण्यासाठी हा शोध लावला होता की जर लोक दुधपाक, खीर, दूध आणि साखर इत्यादी खातील तर त्यांचा पित्त शमेल आणि मलेरियापासून सुटका मिळेल. आता हे लोक घरचे दूध असले तरीही खीर-बीर बनवत नसत. खीर खात नसत, अशी ही माणसे होती! खूप नॉर्मल ना (!) मग काय होणार ते आपण जाणता? आता खीर रोज खाणार तरी कशी?

वडिलांना तर यातला एक अक्षर सुद्धा पोहोचत नाही. पण या लोकांनीच शोधून काढले होते की हिंदुस्तानातील लोक चार आण्याचाही धर्म करतील, असे नाहीत. इतके लोभी आहेत की दोन आणेही धर्म करणार नाहीत. म्हणून असे उल्टे कान पकडायला लावले की, 'निदान तुझ्या बापाचे श्राद्ध तरी कर!' असे सगळे बोलायला येतात. तर अशाप्रकारे श्राद्धाचे नाव दिले. आणि नंतर लोकांनी नंतर सुरू केले की बापाचे श्राद्ध तर करावेच लागेल! आणि माझ्यासारखा कोणी अडून बसणारा असेल आणि तो जर श्राद्ध करत नसेल तर काय म्हणतात? 'बापाचे श्राद्धही करत नाही.' आजूबाजूचे सर्व किचकिच करतात, म्हणून मग तो श्राद्ध करतो, आणि लोकांना खाऊ घालतो.

तेव्हा पौर्णिमेपासून खीर खायला मिळते ते सतत पंधरा दिवस खीर मिळतच राहते. कारण आज माझ्याकडे, उद्या तुझ्याकडे आणि लोकांनाही हे जमले की, 'असो, आळीपाळीनेच खायचे आहे ना! लुबाडले जायचे नाही. आणि मग कावळ्याला खायला द्यायचे.' तर हे असे शोधून काढले. त्याने पित्त सारे शमते. म्हणून या लोकांनी ही व्यवस्था केली होती. म्हणून आमचे लोक त्यावेळी काय सांगत असत की जर सोळा दिवसांच्या श्राद्धानंतर जगला तर नवरात्रीत आला!

## सही केल्याशिवाय मरण सुद्धा नाही

निसर्गाचा नियम असा आहे की तो कोणत्याही मनुष्याला इथून घेऊन जाऊ शकत नाही. मरण्याऱ्याने सही केल्याशिवाय त्याला इथून घेऊन जाता येत नाही. लोक सही करत असतील काय? लोक असे म्हणतात ना की, 'हे भगवंता, आता इथून जायला मिळाले तर चांगले.' असे का बरे बोलतात? ते तुम्ही जाणता का? जेव्हा आतून असे भयंकर दु:ख होते, तेव्हा दु:खामुळे त्रासलेला माणूस असे बोलतो की, 'हा देह सुटला तर बरे.' त्यावेळी त्याची सही घेतली जाते.

## त्याआधी 'माझी' आठवण काढा.

**प्रश्नकर्ता :** दादाजी, असे ऐकले आहे की आत्महत्येनंतर अशाप्रकारचे सात जन्म होतात, तर हे खरे आहे का?

**दादाश्री :** जे संस्कार पडतात, ते सात-आठ जन्मानंतर जातात. म्हणूनच असे काही वाईट संस्कार पडू देऊ नका. वाईट संस्कारांपासून दूर पळा. हो, इथे वाटेल तेवढे दु:ख असेल ते सहन करा, पण स्वत:वर गोळी घालू नका, आत्महत्या करू नका. म्हणून बडोदा शहरात आजपासून काही वर्षांपूर्वी सगळ्यांना मी सांगितले होते की,

आत्महत्येचा विचार आला तर माझी आठवण काढा आणि माझ्याकडे या. अशी माणसे असतात ना, जोखीमवाली माणसे, त्यांना मी असे सांगून ठेवतो. ते मग माझ्याकडे येतात तेव्हा त्यांना समजावतो. त्यामुळे त्या दिवसापासूनच त्याचे आत्महत्या करणे बंद होऊन जाते. 1951 नंतर सगळ्यांना कळवले होते की ज्यांना आत्महत्या करायची असेल त्यांनी आधी मला भेटावे आणि नंतर आत्महत्या करावी. असे कोणी आले की मला आत्महत्या करायची आहे तर मी त्यांना समजावतो. आसपासचे कॉजेस (कारणे), सर्कल, आत्महत्या करण्यासारखे आहे की नाही, हे सर्व नीट समजावून सांगतो आणि त्याला परत फिरवतो.

## आत्महत्येचे फळ

**प्रश्नकर्ता :** एखाद्या मनुष्याने आत्महत्या केली तर त्याची गती काय होते? भूत-प्रेत बनतो?

**दादाश्री :** आत्महत्या केल्याने प्रेत बनतो आणि प्रेत बनून भटकावे लागते. म्हणजे आत्महत्या केल्यानंतर उलट त्रास वाढवून घेतो. एकदा आत्महत्या केली, त्यानंतर कितीतरी जन्मांपर्यंत त्याचा प्रतिध्वनी उमटत राहतो. आणि ही जी आत्महत्या करतो ते काही नवीन करत नाही. ती तर मागील जन्मी आत्महत्या केली होती, त्याच्या प्रतिध्वनीमुळे करतो. ही जी आत्महत्या करतो, ते मागच्या जन्मी केलेल्या आत्महत्या कर्माचे फळ येते. म्हणून आपल्याआपणच आत्महत्या करतो. हे असे प्रतिध्वनी पडलेले असतात की तेच ते करत आलेला असतो. आपल्याआपणच आत्महत्या करतो आणि आत्महत्या केल्यानंतर परत अवगतीवाला जीव होतो. अवगतीवाला म्हणजे देहाशिवाय भटकणारा जीव. भूत बनणे काही सोपे नाही. भूत तर देवगतीचा अवतार आहे, ती सोपी गोष्ट नाही. भूत तर येथे कठोर तप केले असतील, अज्ञान तप केले असतील, तेव्हाच भूत होतो आणि प्रेत, ही तर वेगळी वस्तू आहे.

## विकल्पाशिवाय जगता येत नाही

**प्रश्नकर्ता :** आत्महत्येचे विचार का येत असतील?

**दादाश्री :** ते तर मनातील विकल्प संपलेले असतात म्हणून. विकल्पांच्या आधारावर मनुष्य जगतो. विकल्प संपले की मग आता काय करायचे, त्याचे काहीच दर्शन दिसत नाही. म्हणून मग आत्महत्या करण्याचा विचार करतो. म्हणजे हे विकल्प सुद्धा उपयोगी आहेत.

सहज विचार बंद झाले की मग असे चुकीचे विचार येतात. विकल्प बंद झाले म्हणून जे सहज विचार येत होते, तेही बंद होतात. अगदी अंधारच होतो. मग काहीच दिसत नाही. संकल्प अर्थात 'माझे' आणि विकल्प अर्थात 'मी.' हे दोन्ही बंद होतात, तेव्हाच मरण्याचे विचार येतात.

## आत्महत्येचे कारण

**प्रश्नकर्ता :** हा जो त्याला आत्महत्या करण्याचा विचार आला, त्याचे रुट (मूळ) काय आहे?

**दादाश्री :** आत्महत्येचे रुट असे असते की त्याने कोणत्याही जन्मात आत्महत्या केली असेल तर त्याचा प्रतिध्वनी सात जन्मांपर्यंत राहतो. जसे की आपण एखादा चेंडू तीन फुटावरून टाकला, तर तो आपल्याआपणच दुसऱ्यांदा अडीच फूट, नंतर एक फूट उडून खाली पडेल, असे होते की नाही? तीन फूट पूर्ण उडत नाही. पण स्वतःच्या स्वभावानुसार अडीच फूट उडून परत खाली पडतो, तिसऱ्यांदा दोन फुट उडून खाली पडतो, चौथ्यांदा दीड फूट उडून परत खाली पडतो, परत एक फूट उडून खाली पडतो. असा त्याच्या गतीचा नियम असतो. असेच निसर्गाचेही नियम आहेत. जर त्याने

आत्महत्या केली ना, तर सात जन्मांपर्यंत आत्महत्या करावीच लागते. आता त्यात कमी जास्त परिणामाने आत्महत्या आपल्याला पूर्णच दिसते, परंतु परिणाम कमी तीव्रतेचे असतात आणि कमी होत-होत, परिणाम संपून जातात.

## अंतिम क्षणी

मरतेवेळी पूर्ण आयुष्यात जे केले होते, त्याचे सार येते. ते सार पाऊण तासापर्यंत वाचत राहिल्यानंतर नवीन देह निश्चित होतो. शेवटी दोन पायातून चार पायांमध्ये जातो. येथे पोळी खाता खाता, तिथे गवत खातो. या कलियुगाचे माहात्म्य असेच आहे. हे मनुष्यत्व परत मिळणे अवघड आहे, असा आहे हा कलियुगाचा काळ.....

**प्रश्नकर्ता :** काय माहीत, अंतिम वेळी कान बंदही झाले तर?

**दादाश्री :** अंतिम वेळेस तर आज जे आपल्या वहीखात्यात जमा आहे तेच समोर येते. मृत्यूवेळीचा तास, जे गुणस्थान येते ते सार आहे आणि तो ताळेबंद हिशोब फक्त संपूर्ण जीवनाचा नाही, परंतु आधी जो जन्म होता आणि नंतरचा, या मधल्या भागाचा हिशोब आहे. मृत्युच्यावेळी लोक कानाजवळ बोलतात की, 'राम बोला, राम बोला' अरे मूर्खा, रामांना का बोलावतोस? राम तर गेले कधीचेच!

पण लोकांनी असे शिकवले की असे काहीतरी करावे. परंतु ते तर आत पुण्य जागे असेल तरच एडजस्ट होते. आणि तो मरणारा तर मुलीच्या लग्नाच्या काळजीतच पडलेला असतो. या तीन मुलींचे लग्न झाले आणि ही चौथी राहून गेली. या तिघी विवाहित झाल्या पण ही धाकटी तेवढी राहिली. रक्कम मांडली की मग ती पुढे येऊन उभी राहील. आणि ते लहानपणी चांगले केलेले समोर येत नाही, पण म्हातारपणी चांगले केलेले समोर येते.

## निसर्गाचा किती सुंदर कायदा

म्हणजे येथून जातो, तो सुद्धा निसर्गाचा न्याय, ठीक आहे ना! परंतु वीतराग सावधान करतात की भाऊ, पन्नास वर्षे झाली आता सावध हो!

पंच्याहत्तर वर्षाचे आयुष्य असेल तर पन्नास वर्षात पहिला फोटो निघतो आणि साठ वर्षाचे आयुष्य असेल, तर चाळीसाव्या वर्षी फोटो निघतो. एक्यांशी वर्षाचे आयुष्य असेल तर चौपनाव्या वर्षी फोटो निघतो. परंतु तोपर्यंत इतका टाईम फ्री ऑफ कॉस्ट (मोफत) मिळतो, दोन तृतीयांश हिस्सा फ्री मध्ये मिळतो आणि एक तृतीयांश भाग, त्याचा मग फोटो निघत राहतो. कायदा चांगला आहे की जोर-जबरदस्तीवाला आहे? जोर-जबरदस्तीवाला नाही ना? न्यायसंगत आहे ना? दोन तृतीयांश भागात उड्या मारल्या असतील, त्याची आम्हाला आपत्ती नाही, पण आता तरी सरळ हो ना, असे सांगतात.

## क्षणोक्षणी भाव मरण

**प्रश्नकर्ता :** देहाचा मृत्यू तर म्हटला जातो ना?

**दादाश्री :** अज्ञानी मनुष्याचे दोन प्रकारे मरण होते. रोज भाव मरण होत असते. क्षणोक्षणी भाव मरण आणि शेवटी देहाचा मृत्यू होतो. परंतु त्याचे मरणे-रडणे रोजचेच. क्षणोक्षणी भाव मरण. म्हणून कृपाळूदेवांनी लिहिले आहे की,

*'क्षण-क्षण भयंकर भाव मरणे कां अहो राची रह्यो!*

(क्षणोक्षणी भयंकर भाव मरण, तरी का तू प्रसन्न आहेस!')

हे सर्वजण जगतात, ते मरण्यासाठी जगतात की इतर कशासाठी?

## समाधी मरण

म्हणून मृत्यूला सांगावे की, 'तुला लवकर यायचे असेल तर लवकर ये, उशिरा येणार असशील तर उशिरा ये, परंतु 'समाधी मरण' बनून ये!

समाधी मरण अर्थात आत्म्याशिवाय दुसरे काहीच आठवत नाही. निजस्वरूप शुद्धात्म्याशिवाय दुसऱ्या ठिकाणी चित्त नसतेच. मन-बुद्धी-चित्त-अहंकार कशाचाही चंचलता नसते. निरंतर समाधी! देहाला उपाधी असली तरी ती स्पर्शत नाही. देह तर उपाधीवालाच आहे ना?

**प्रश्नकर्ता :** हो.

**दादाश्री :** केवळ उपाधीवालाच नाही, तर व्याधीवाला सुद्धा आहे ना? ज्ञानींना उपाधी शिवत नाही. व्याधी झाली असेल तर ती सुद्धा शिवत नाही, आणि अज्ञानी तर व्याधी नसेल तरी व्याधीला बोलवतो. समाधी मरण अर्थात 'मी शुद्धात्मा आहे' असे भान असणे, आपल्या किती तरी महात्म्यांचे मृत्यू झाले, त्या सगळ्यांना 'मी शुद्धात्मा आहे,' 'मी शुद्धात्मा आहे' असे भान राहत होते.

## गतीची निशाणी

**प्रश्नकर्ता :** मृत्यूच्या वेळी अशी कोणती खूण आहे की ज्यामुळे समजेल की या जीवाची गती चांगली झाली आहे की नाही?

**दादाश्री :** त्यावेळी 'माझ्या मुलीचे लग्न झाले की नाही? हे काम झाले नाही,' अशा कारणांनी सगळे घर डोक्यावर घेत असेल, उपाधी करत असेल, तर समजायचे की त्याची अधोगती झाली. आणि जर आत्म्यात राहत असेल अर्थात भगवंतांच्या नामात राहत असेल, तर चांगली गती झाली.

**प्रश्नकर्ता :** परंतु काही दिवस बेशुद्धीत असेल तर?

**दादाश्री :** बेशुद्धीत असेल, तरीही आतून ज्ञानात असेल तर चालेल. मात्र हे ज्ञान घेतलेले असावे. मग तो बेशुद्ध असला तरीही चालेल.

## मृत्यूची भीती

**प्रश्नकर्ता :** तर सगळ्यांना मृत्यूची भीती का वाटत असते?

**दादाश्री :** मृत्यूची भीती तर अहंकाराला वाटत असते. आत्म्याला काहीच नसते. भीती अहंकाराला असते की, मी मरून जाईन. मी मरून जाईन.

## या दृष्टीने बघा तरी....

असे आहे ना, भगवंताच्या दृष्टीने या जगात काय चालले आहे? तर म्हणे, 'त्यांच्या दृष्टीने तर कोणी मरतच नाही,' भगवंताची जी दृष्टी आहे ती दृष्टी जर तुम्हाला प्राप्त झाली, एका दिवसासाठी जर ती दृष्टी तुम्हाला प्राप्त झाली, तर इथे कितीही लोक मेले तरीही तुमच्यावर त्याचा परिणाम होणार नाही. कारण भगवंताच्या दृष्टीने कोणी मरतच नाही.

## जीव तर मरण, शिव तर अमर

कधी ना कधी तर सोल्यूशन काढावे लागेल ना? जीवन-मृत्यूचे सोल्यूशन नाही का काढावे लागणार? खरोखर स्वतः मरतही नाही आणि जगतही नाही. स्वतःला जीव मानून बसला आहे ही मान्यताच चुकीची आहे. स्वतःचे स्वरूप शिव आहे. स्वतः शिव आहे पण ते त्याला समजत नाही आणि स्वतःला जीव स्वरूप मानून बसला आहे!

**प्रश्नकर्ता :** असे प्रत्येक जीवाला समजायला लागले तर जग चालणार नाही ना?

**दादाश्री :** हो, चालणारच नाही! परंतु हे प्रत्येक व्यक्तीला समजेलच असे नाही ना! हे तर पझल (कोडे) आहे, अत्यंत गुह्य, अतिशय गुह्यतम. गुह्यतमच्या कारणामुळे तर हे सर्व असे थोतांड जग चालूच राहते.

### जगतो-मरतो, तो कोण?

हा जन्म-मृत्यू आत्म्याला नाही. आत्मा परमनन्ट वस्तू आहे. जन्म-मृत्यू इगोइजमला (अहंकाराला) आहे. इगोइजम जन्म घेतो आणि इगोइजम मरतो. वास्तवात आत्मा स्वतः मरतच नाही. अहंकारच जन्म घेतो आणि अहंकारच मरतो.

# मृत्यूवेळी, मृत्यू आधी आणि मृत्यूनंतर

## आत्म्याची स्थिती

### जन्म-मरण काय आहे?

**प्रश्नकर्ता :** जन्म-मरण काय आहे?

**दादाश्री :** जन्म-मरण, हे तर होतच राहते. आणि आपण बघतच असतो की त्यात काय आहे, त्यात विचारण्यासारखे काही नाही. जन्म-मरण अर्थात त्याच्या कर्माचा हिशोब पूर्ण झाला. एका जन्माचा जो हिशोब बांधला होता, तो पूर्ण झाला, म्हणून मरण येते.

### मृत्यू म्हणजे काय?

**प्रश्नकर्ता :** मृत्यू म्हणजे काय?

**दादाश्री :** मृत्यू तर, असे आहे ना, हा शर्ट शिवला अर्थात शर्टाचा जन्म झाला आणि जन्म झाला म्हणून मृत्यू झाल्याशिवाय राहतच नाही! कोणत्याही वस्तूचा जन्म होतो, त्याचा मृत्यू अवश्य होतो. आणि आत्मा अजन्म-अमर आहे, त्याचा मृत्यू होतच नाही. म्हणजे जितक्या वस्तू जन्मतात, त्यांचा मृत्यू अवश्य होतो आणि मृत्यू आहे म्हणून जन्म होणार. जन्माबरोबर मरण जोडले गेलेले आहे. जन्म आहे तिथे मृत्यू अवश्य होतोच.

**प्रश्नकर्ता :** मृत्यू कशा करता आहे?

**दादाश्री :** मृत्यू तर, असे आहे ना, या देहाचा जन्म झाला तो एक संयोग आहे, त्याचा वियोग झाल्याशिवाय राहत नाही ना! संयोग नेहमीच वियोगी स्वभावाचे असतात. आपण शाळेत शिकायला गेलो तेव्हा सुरूवात केली होती की नाही, बिगिनिंग? मग ॲन्ड (अंत) आला की नाही? प्रत्येक गोष्ट बिगिनिंग आणि ॲन्डवालीच असते. इथे या सगळ्या गोष्टींचा बिगिनिंग आणि ॲन्ड होतोच. नाही समजले का तुम्हाला?

**प्रश्नकर्ता :** हो, समजले ना!

**दादाश्री :** या सगळ्या गोष्टी बिगिनिंग-ॲन्ड म्हणजे आरंभ आणि शेवट असलेल्या आहेत, परंतु बिगिनिंग-ॲन्ड यास जाणणारा कोण आहे?

सगळ्या वस्तू बिगिनिंग-ॲन्डवाल्या आहेत त्या टेम्परारी (अस्थायी-तात्पुरत्या) वस्तू आहेत. ज्याचे बिगिनिंग होते, त्याचा ॲन्ड होतो, सुरूवात आहे त्याचा अंत अवश्य आहेच. या सगळ्या वस्तू टेम्परारी आहेत, परंतु टेम्परारीला जाणणारा कोण आहे? तुम्ही परमनन्ट आहात, कारण तुम्ही या वस्तूंना टेम्परारी म्हणता, म्हणून तुम्ही परमनन्ट आहात, जर सगळ्या गोष्टी टेम्परारी असतील तर मग टेम्परारी म्हणण्याची गरजच

नव्हती. टेम्परारी सापेक्ष शब्द आहे. परमनन्ट आहे म्हणून टेम्परारी पण आहे.

## मृत्यूचे कारण

**प्रश्नकर्ता :** तर मृत्यू का येतो?

**दादाश्री :** ते तर असे आहे, जेव्हा जन्म होतो, तेव्हा ह्या मन-वचन-कायेच्या तीन 'बॅटऱ्या' आहेत, की ज्या गर्भामधून इफेक्ट (परिणाम) देत जातात. तो इफेक्ट संपतो. 'बॅटरींचा' हिशोब पूर्ण होईपर्यंत त्या बॅटऱ्या राहतात आणि नंतर संपून जातात, त्याला मृत्यू म्हणतात. पण तोपर्यंत आतमध्ये परत पुढच्या जन्मासाठी नवीन बॅटऱ्या चार्ज झालेल्या असतात. पुढच्या जन्मासाठी आतमध्ये नवीन बॅटऱ्या चार्ज होत असतात आणि जुन्या 'बॅटऱ्या' 'डिस्चार्ज' होत राहतात. असे 'चार्ज-डिस्चार्ज' होतच राहते. कारण त्याला 'रोंग बिलीफ' (चुकीची मान्यता) आहे. म्हणून 'कॉजेस' (कारणे) उत्पन्न होत राहतात, जोपर्यंत 'रोंग बिलीफ' आहे, तोपर्यंत राग-द्वेष आणि कॉजेस उत्पन्न होत राहतात आणि जेव्हा ती 'रोंग बिलीफ' बदलते आणि 'राईट बिलीफ' बसते तेव्हा मग राग-द्वेष आणि कॉजेस उत्पन्न होत नाहीत.

## पुनर्जन्म

**प्रश्नकर्ता :** जीवात्मा मेल्यानंतर परत येतो ना?

**दादाश्री :** त्याचे असे आहे की, फॉरेनवाल्यांचा परत येत नाही, मुस्लिमांचा परत येत नाही. परंतु तुमचा परत येतो. तुमच्या भगवंताची इतकी कृपा आहे की तुमचा परत येतो. इथून मेला की तिथे दुसऱ्या योनीत प्रवेश करतो. आणि त्यांचा तर परत येत नाही.

आता खरोखर परत येत नाही असे नाही. त्यांची मान्यता अशी

आहे की येथून मेला म्हणजे मेला, परंतु वास्तवात परत येतोच. पण हे त्यांना समजत नाही. पुनर्जन्मच समजत नाहीत. तुम्हाला पुनर्जन्म समजतो ना?

शरीराचा मृत्यू झाला की ते जड होऊन जाते. त्यावरून सिद्ध होते की त्याच्यात जीव होता तो निघून दुसऱ्या ठिकाणी गेला. फॉरेनवाले तर म्हणतात की हा तोच जीव होता आणि तोच जीव मेला. आपण सर्व हे कबूल करत नाही. आपण पुनर्जन्मात मानतो. आपण 'डेव्हलप' (विकसित) झालेलो आहोत. आपण वीतराग विज्ञानाला जाणतो. वीतराग विज्ञान सांगते की, पुनर्जन्माच्या आधारावर आपण सर्व एकत्र आलो आहोत, असे हिंदुस्तानात समजतात. त्या आधारावर आपण आत्म्याला मानायला लागलो. जर पुनर्जन्माचा आधार नसता तर आत्म्याला कसे काय मानले असते?

मग पुनर्जन्म कोणाचा होतो? तर आत्मा आहे म्हणून पुनर्जन्म होतो, कारण की देह तर मेला, त्याला जाळले गेले, असे आपण बघत असतो.

अर्थात आत्मा समजला तरच सुटका होईल. पण ते समजेल असे नसते! म्हणून तमाम शास्त्रकारांनी सांगितले की, 'आत्मा जाणा.' त्याला ओळखल्याशिवाय जे काही केले जाते, ते सगळे त्याच्या फायद्याचे नाही, उपयोगी नाही. आधी आत्मा जाणला तर सर्व प्रश्न सुटतील.

## पुनर्जन्म कोणाचा?

**प्रश्नकर्ता :** पुनर्जन्म कोण घेतो? जीव घेतो की आत्मा घेतो?

**दादाश्री :** नाही. कोणालाही घ्यावा लागत नाही, मिळून जातो. हा संपूर्ण जग 'इट हेपन्स' (स्वयं संचालित)च आहे.

**प्रश्नकर्ता :** हो, पण तो (पुनर्जन्म) कोणापासून होतो? जीवापासून होतो की आत्म्यापासून?

**दादाश्री :** नाही, आत्म्याला काही देणेघेणे नाही. सर्व काही जीवापासूनच आहे. ज्याला भौतिक सुख पाहिजे, त्याला योनीमध्ये प्रवेश करण्याचा 'राईट' (अधिकार) आहे. ज्याला भौतिक सुख नको असेल त्याचा योनीमध्ये प्रवेश करण्याचा अधिकार संपतो.

## संबंध जन्मोजन्मीचा

**प्रश्नकर्ता :** मनुष्याच्या प्रत्येक जन्माचा पुनर्जन्माशी काही संबंध आहे का?

**दादाश्री :** प्रत्येक जन्म हा पुनर्जन्मच असतो. प्रत्येक जन्माचा संबंध पुनर्जन्माशीच असतो.

**प्रश्नकर्ता :** परंतु पुनर्जन्माचे या जन्माशी काय देणेघेणे आहे?

**दादाश्री :** अरे, पुढच्या जन्मासाठी हा पूर्वजन्म झाला. आधीचा जन्म, तो पूर्वजन्म आहे, तर हा जन्म आहे तो पुढच्या जन्माचा पूर्वजन्म म्हटला जाईल.

**प्रश्नकर्ता :** हो, ही गोष्ट खरी आहे. पण पूर्वजन्मात असे काही घडते का, ज्याचा या जन्मात काही संबंध असतो?

**दादाश्री :** खूपच संबंध असतो. पूर्वजन्मात बीज पडते आणि दुसऱ्या जन्मात फळ येते. तर त्या बीजात आणि फळात फरक नाही का? संबंध आला की नाही? आपण बाजरीचे दाणे पेरू, तो पूर्वजन्म आणि कणीस आले, तो हा जन्म, परत या कणसातून बीजरूपात दाणा पडेल तो पूर्वजन्म आणि त्याच्यातून कणीस आले, तो नवीन जन्म, समजले की नाही?

**प्रश्नकर्ता :** एक माणूस रस्त्यावरून चालत जात आहे आणि दुसरी सुद्धा कितीतरी माणसे रस्त्यावरून चालत आहेत, पण एखादा साप ठराविक माणसालाच चावतो, त्याचे कारण पुनर्जन्मच?

**दादाश्री :** हो. आम्ही हेच सांगू इच्छितो की पुनर्जन्म आहे. म्हणून तो साप तुम्हाला चावतो. पुनर्जन्म नसता तर तुम्हाला साप चावला नसता. पुनर्जन्म आहे, तो तुम्हाला तुमच्या हिशोबाची परतफेड करतो. हे सगळे हिशोब फेडले जात आहेत. जसे वहीखात्यातले हिशोब फेडले जातात तसेच सर्व हिशोब फेडले जातात. आणि 'डेव्हलपमेंट'मुळे हे सर्व हिशोब आपल्याला समजतात सुद्धा. म्हणूनच आपल्या इथे कित्येक लोकांमध्ये पुनर्जन्म आहेच अशी मान्यताही बसलेली आहे. परंतु ते पुनर्जन्म आहेच असे ठाम सांगू शकत नाहीत. 'आहेच' असे पुरावे देऊ शकत नाहीत. परंतु अशा सगळ्या उदाहरणांमुळे त्यांच्या श्रद्धेत पक्के बसलेले आहे की पुनर्जन्म आहे हे नक्की.

या ताई म्हणतील, तिला सासू चांगली का मिळाली आणि मला का अशी मिळाली? म्हणजे संयोग सगळे वेगवेगळे मिळतील.

## सोबत आणखी काय जाते?

**प्रश्नकर्ता :** एक जीव जेव्हा दुसऱ्या देहात जातो तेव्हा तिथे सोबत पंचेंद्रिय आणि मन वगैरे सर्व घेऊन जातो?

**दादाश्री :** नाही, नाही. काहीही नाही. सगळी इंद्रिये एक्जॉस्ट (रिकामी) होऊन संपून जातात. इंद्रिये तर मरून गेली. म्हणून त्याच्यासोबत इंद्रिये वगैरे काहीही जात नाहीत. केवळ हे क्रोध-मान-माया-लोभ जातात, त्या 'कारण शरीरात' क्रोध-मान-माया-लोभ हे सगळेच येतात. आणि 'सूक्ष्म शरीर' कसे असते? जोपर्यंत मोक्षाला जात नाही, तोपर्यंत सोबतच राहते. कुठेही जन्म होऊ दे, पण हे सूक्ष्म शरीर तर सोबतच असते.

## इलेक्ट्रिकल बॉडी

आत्मा देहाला सोडून एकटा जात नाही. आत्म्यासोबत सर्व कर्म, जे कारण शरीर म्हटले जाते ते, आणि तिसरे इलेक्ट्रिकल बॉडी (तेजस शरीर). हे तिन्ही सोबत निघतात. जोपर्यंत हा संसार आहे, तोपर्यंत प्रत्येक जीवात इलेक्ट्रिकल बॉडी असतेच! कारण शरीर बनले की इलेक्ट्रिकल बॉडी सोबतच असते. इलेक्ट्रिकल बॉडी प्रत्येक जीवात सामान्य भावाने असतेच आणि त्या आधारावर आपले सर्व चालत असते, जेवण जेवतो ते पचवण्याचे काम इलेक्ट्रिकल बॉडी करते. रक्त वगैरे बनते, रक्त शरीरात वरती चढवणे, खाली उतरवणे, हे सगळे कार्य आतमध्ये करत राहते. डोळ्यांनी दिसते, तो लाईट या इलेक्ट्रिकल बॉडीच्या कारणाने असतो. आणि हे क्रोध-मान-माया-लोभ तेसुद्धा या इलेक्ट्रिकल बॉडीच्या कारणानेच होतात. आत्म्यामध्ये क्रोध-मान-माया-लोभ नाहीच. हे चिडणे, हे सगळेच इलेक्ट्रिकल बॉडीचे शॉक (आघात) आहेत.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे 'चार्ज' होण्यामध्ये इलेक्ट्रिकल बॉडी काम करत असेल ना?

**दादाश्री :** इलेक्ट्रिकल बॉडी असेल, तेव्हाच चार्ज होते. इलेक्ट्रिकल बॉडी नसेल, तर हे सर्व चालणारच नाही. 'इलेक्ट्रिकल बॉडी' असेल आणि आत्मा नसेल तरीही काहीच होणार नाही. हे सारे समुच्चय 'कॉजेस' आहेत.

## गर्भात जीवाचा प्रवेश केव्हा?

**प्रश्नकर्ता :** संचार होतो, तेव्हा जीव प्रवेश करतो, प्राण येतो, असे वेदांमध्ये सांगितले आहे.

**दादाश्री :** नाही. त्या सगळ्या लौकिक गोष्टी आहेत, अनुभवाच्या गोष्टी नाहीत. खऱ्या गोष्टी नाहीत. ती लौकिक भाषा झाली. जीवाशिवाय

कधीही गर्भधारणा होत नाही, जीवाच्या उपस्थितीतच गर्भधारणा होते, नाही तर धारणा होत नाही.

त्या आधी तर तो अंड्यासारखा बेभान अवस्थेमध्ये राहत असतो.

**प्रश्नकर्ता :** कोंबडीच्या अंड्यात छेद बनवून जीव आत शिरलेला आहे का?

**दादाश्री :** नाही. ते तर लौकिकतेत असे आहे. लौकिकतेत तुम्ही म्हणता, तसेच लिहिले आहे. कारण गर्भधारणा होणे तो काळ, वगैरे सर्व सायन्टिफिक सरकमस्टेन्शियल एविडन्स आहे. योग्य काळ पण यायला हवा, तेव्हाच धारणा होते.

नऊ महिने गर्भात जीव राहतो तेव्हा प्रकट होतो आणि सात महिन्यांचा जीव असेल, तेव्हा कमी महिन्यात जन्म झाला म्हणून कच्चा असतो. त्याचे डोके-बिके, (मेंदु) सगळे कच्चे असते. सगळे अंग कच्चे असतात, सातव्या महिन्यात जन्म झाला म्हणून. आणि अठरा महिन्याने जन्म झाला तर ती गोष्टच वेगळी, खूप उच्च कोटीच बुद्धिमता असते. अर्थात नऊ महिन्यापेक्षा जितके जास्त महिने होतात तितकी त्याची 'टॉप' हुशारी असते. हे माहित आहे का?

का बोलत नाही? तुम्ही कधी असे ऐकले नाही का, की हा अठरा महिन्यांचा आहे! ऐकले आहे? पूर्वी असे ऐकण्यात आले नाही? की जाऊ द्या ना, त्याची आई तर सांगत असते की हा अठरा महिन्यांचा आहे. म्हणजे तो खूप हुशार असतो. त्याच्या आईच्या पोटातून बाहेर निघतच नाही. अठरा महिन्यापर्यंत ऐटीत राहतो तिथे!

## मध्ये वेळ किती?

**प्रश्नकर्ता :** हा देह सोडणे आणि दुसरा देह धारण करणे, या दोन्हींमध्ये असा किती वेळ लागतो?

**दादाश्री :** काहीच वेळ लागत नाही. इथून या देहातून अजून निघत आहे आणि तिथे योनीमध्ये हजर होतो, कारण हे टाईमिंग आहे. वीर्य आणि रज यांचा संयोग होतो त्या वेळेला. इथून देह सुटणार असेल आणि तिथे तो संयोग जुळून येतो, हे सर्व एकत्र होते तेव्हा इथून जातो. नाही तर तो इथून जातच नाही. अर्थात मनुष्याच्या मृत्यूनंतर तो आत्मा इथून सरळ दुसऱ्या योनिमध्ये जातो. म्हणून पुढे काय होईल याची काहीही चिंता करण्यासारखे नाही. कारण मेल्यानंतर दुसरी योनी प्राप्त होऊनच जाते. आणि त्या योनीमध्ये प्रवेश करताच तिथे जेवण वगैरे सर्व मिळते.

## त्यापासून सर्जन होते कारण देहाचे

जग भ्रांतीचे आहे, ते क्रिया बघते. ध्यानाला बघत नाही. ध्यान पुढच्या जन्माचा पुरुषार्थ आहे आणि क्रिया, मागील जन्माचा पुरुषार्थ आहे. ध्यान हे पुढच्या जन्मात फळ देणार आहे. ध्यान झाले की त्यावेळी बाहेरून परमाणू ओढले जातात आणि ते ध्यान स्वरुप होऊन आत सूक्ष्मपणे संग्रहित होतात आणि 'कारण-देहाचे' सर्जन होते. जेव्हा ऋणानुबंधाने मातेच्या गर्भात जातो, तेव्हा 'कार्य-देहाची' रचना होते. मनुष्य मरतो तेव्हा आत्मा, सूक्ष्म-शरीर तसेच कारण-शरीर, सोबत जातात. सूक्ष्म-शरीर प्रत्येकाचे कॉमन असते परंतु कारण-शरीर प्रत्येकाचे त्याच्या द्वारे केलेल्या कॉजेस अनुसार वेगवेगळे असते. सूक्ष्म-शरीर हे इलेक्ट्रिकल बॉडी (तेजस-शरीर) आहे.

## कारण-कार्याची शृंखला

मृत्यूनंतर जन्म आणि जन्मानंतर मृत्यू आहे, बस. हे निरंतर चालूच राहते. आता हा जन्म आणि मृत्यू का झाले आहेत? तर 'कॉजेस ॲन्ड इफेक्ट, इफेक्ट ॲन्ड कॉजेस' कारण आणि कार्य, कार्य आणि कारण. त्यात जर कारणांचा नाश केला गेला, तर हे सारे 'इफेक्ट' बंद होतील, मग नवीन जन्म घ्यावा लागणार नाही.

इथे आयुष्यभर 'कॉजेस' (कारणे) उभे केले आहेत. ते तुमचे 'कॉजेस' कोणाकडे जाणार? आणि 'कॉजेस' केले आहेत म्हणून ते तुम्हाला कार्यफळ दिल्याशिवाय राहत नाहीत. तुम्ही 'कॉजेस' तयार केले आहेत, असे तुम्हाला समजते का?

प्रत्येक कार्यात कॉजेस तयार होतात. तुम्हाला कोणी नालायक म्हटले तर तुमच्या आत 'कॉजेस' तयार होतात. 'तुझा बाप नालायक आहे' हे तुमचे 'कॉजेस' म्हटले जातात. तुम्हाला नालायक म्हटले ते तर नियमानुसार म्हटले गेले आणि तुम्ही त्याला बेकायदेशीर करून टाकले. हे समजले नाही का तुम्हाला? का बोलत नाही?

**प्रश्नकर्ता :** बरोबर आहे.

**दादाश्री :** अर्थात 'कॉजेस' या जन्मात होतात. त्याचा इफेक्ट पुढच्या जन्मी भोगावा लागतो!

हे तर 'इफेक्टिव' (परिणाम) मोहाला 'कॉजेस' (कारण) मोह मानले जाते. तुम्ही फक्त असे मानता, की 'मी क्रोध करतो' परंतु ही तर तुम्हाला भ्रांती आहे तोपर्यंतच क्रोध आहे. बाकी, हा क्रोध नाहीच, हा तर इफेक्ट आहे. आणि कॉजेस बंद झाले, तेव्हा इफेक्ट एकटाच राहतो, आणि हे 'कॉजेस' बंद झाले म्हणून 'ही इज नॉट रिस्पोन्सिबल फॉर इफेक्ट' (परिणामासाठी स्वतः जबाबदार नाही). आणि 'इफेक्ट' आपला प्रभाव दाखवल्याशिवाय राहत नाही.

## कारणे बंद होतात का?

**प्रश्नकर्ता :** देह आणि आत्मा यांच्यात संबंध तर आहे ना?

**दादाश्री :** हा देह आहे, तो आत्म्याच्या अज्ञान दशेचा परिणाम आहे. जे जे 'कॉजेस' केले, त्यांचा हा 'इफेक्ट' आहे. कोणी तुम्हाला फुले वाहिली तर तुम्ही खुश होता आणि कोणी तुम्हाला शिव्या दिल्या

तर तुम्ही चिडता. या चिडण्यात आणि खुश होण्यात बाह्य दर्शनाची किंमत नाही, आंतरभावामुळे कर्म चार्ज होतात, त्याचा मग पुढच्या जन्मात 'डिस्चार्ज' होतो. त्यावेळी ते 'इफेक्टिव' आहे. हे मन-वचन-काया तिन्ही 'इफेक्टिव' आहेत. 'इफेक्ट' भोगतेवेळी दुसरे नवीन 'कॉजेस' उत्पन्न होतात, जे पुढील जन्मात परत 'इफेक्टिव' होतात. या प्रकारे 'कॉजेस ॲन्ड इफेक्ट, इफेक्ट ॲन्ड कॉजेस' हा क्रम निरंतर चालूच राहतो.

केवळ मनुष्यजन्मातच कॉजेस बंद होऊ शकतील असे शक्य आहे. अन्य सगळ्या गतींमध्ये केवळ 'इफेक्ट' च आहेत. इथे 'कॉजेस ॲन्ड इफेक्ट' दोन्ही आहेत. आम्ही ज्ञान देतो तेव्हा 'कॉजेस' बंद करतो. मग नवीन 'इफेक्ट' होत नाहीत.

## तोपर्यंत भटकायचे आहे....

'इफेक्टिव बॉडी' अर्थात मन-वचन-कायेच्या तीन बॅटऱ्या तयार होऊन जातात आणि त्यातून परत नवीन 'कॉजेस' उत्पन्न होत राहतात. अर्थात या जन्मामध्ये मन-वचन-काया डिस्चार्ज होत राहतात. आणि दुसऱ्या बाजूने आतमध्ये नवीन चार्ज होत राहतो. मन-वचन-कायेच्या ज्या बॅटऱ्या आत चार्ज होत असतात त्या पुढच्या जन्मासाठी आहेत, आणि ज या मागील जन्माच्या आहेत, त्या आज डिस्चार्ज होत आहेत. 'ज्ञानी पुरुष' नवीन 'चार्ज' बंद करून टाकतात. म्हणून जुने 'डिस्चार्ज' होत राहते.

मृत्यूनंतर आत्मा दुसऱ्या योनीत जातो. जोपर्यंत स्वतःचे, 'सेल्फ'चे रियलाइजेशन (आत्म्याची ओळख) होत नाही तोपर्यंत सगळ्या योनींमध्ये भटकत राहतो. जोपर्यंत मनात तन्मयाकार होतो, बुद्धित तन्मयाकार होतो तोपर्यंत संसार उभा राहतो. कारण तन्मयाकार होणे अर्थात योनीमध्ये बीज पडणे आणि कृष्ण भगवंतांनी सांगितले आहे की योनीमध्ये बीज पडते आणि त्यामुळे हा संसार उभा राहिला आहे. योनीत बीज पडणे बंद झाले की त्याचा संसार समाप्त झाला.

## विज्ञान वक्रगतीचे आहे

**प्रश्नकर्ता :** 'थियरी ऑफ इवोल्युशन' (उत्क्रांतिवाद)च्या अनुसार जीव एक इंद्रिय, दोन इंद्रिय असे 'डेव्हलप' होत-होत मनुष्यरुपात येतो आणि मनुष्यरुपातून परत जनावरात जातो. तर या 'इवोल्युशन थियरी'मध्ये जरा विरोधाभास वाटतो. ते जरा स्पष्ट कराल?

**दादाश्री :** नाही. यात विरोधाभासासारखे काहीच नाही. 'इवोल्युशनची थियरी' सगळी बरोबर आहे. केवळ मनुष्यापर्यंतच 'इवोल्युशनची थियरी' खरी आहे. मग त्याच्या पुढची गोष्ट ते वैज्ञानिक जाणत नाहीत.

**प्रश्नकर्ता :** मनुष्यातून पशूमध्ये परत जातो का? हा माझा प्रश्न आहे.

**दादाश्री :** असे आहे. आधी डार्विनच्या 'उत्क्रांतीवादा'च्या थियरीनुसार 'डेव्हलप' होत-होत मनुष्यापर्यंत येतो आणि मनुष्यात आला म्हणून 'इगोइजम' (अहंकार) सोबत असल्यामुळे कर्ता होतो. कर्माचा कर्ता होतो, म्हणून मग कर्मानुसार त्याला भोगण्यासाठी जावे लागते. 'डेबिट' (पाप) करेल तेव्हा जनावरात जावे लागेल आणि 'क्रेडिट' (पुण्य) करेल, तेव्हा देवगतीत जावे लागेल किंवा मग मनुष्य गतीत राजपद मिळेल. अर्थात मनुष्यात आल्यानंतर 'क्रेडिट' आणि 'डेबिट' वर अवलंबून आहे.

## नंतर नाहीत चौऱ्यांशी लक्ष योनी

**प्रश्नकर्ता :** परंतु असे म्हणतात ना की, मानवजन्म की जो चौऱ्यांशी लक्ष योनीमध्ये भटकल्यानंतर मिळतो, तर त्याला परत एवढे भटकावे लागते त्यानंतर मानवजन्म मिळतो?

**दादाश्री :** नाही. असे काही नाही. एकदा मनुष्यजन्म मिळाला तर परत पूर्ण चौऱ्यांशी लक्ष भटकावे लागत नाही. त्याला जर पाशवतेचे

विचार आले तर जास्तीत जास्त आठ जन्म त्याला पशुयोनीत जावे लागेल. ते ही केवळ शे-दोनशे वर्षांसाठी. त्यानंतर परत इथल्या इथेच मनुष्यात येतो. एकदा मनुष्य झाल्यानंतर चौऱ्यांशी लाख फेऱ्यात परत भटकावे लागत नाही.

**प्रश्नकर्ता :** एकच आत्मा चौऱ्यांशी लाख फेऱ्यात फिरतो ना?

**दादाश्री :** हो. एकच आत्मा.

**प्रश्नकर्ता :** पण आत्मा तर पवित्र आहे ना?

**दादाश्री :** आत्मा पवित्र तर या क्षणाही आहे. चौऱ्यांशी लाख योनीमध्ये फिरुनही पवित्रच राहिला आहे. पवित्र होता आणि पवित्रच राहील!!

## वासनेच्या अनुसार गती

**प्रश्नकर्ता :** मरणाआधी जशी वासना असेल, त्याच रूपात जन्म होतो ना?

**दादाश्री :** हो, ती वासना, आपल्यातील लोक म्हणतात ना की, मरणाआधी अशी वासना होती. पण ती वासना काही अशीच होत नाही, तो तर हिशोब आहे संपूर्ण जीवनाचा. आयुष्यभरात तुम्ही जे काही केले असेल, त्याचा मृत्यूवेळी शेवटचा जो तास असतो तेव्हा हिशोब समोर येतो आणि त्या हिशोबानुसार त्याची गती होते.

## मनुष्यातून मनुष्यच बनतो का?

**प्रश्नकर्ता :** मनुष्यातून मनुष्यातच जाणार आहोत ना?

**दादाश्री :** ही त्याची स्वतःची चुकीची समज आहे. तसे तर स्त्रीच्या पोटातून मनुष्यच जन्म घेतो, तेथे कोणी गाढव जन्माला येत नाही. मात्र तो असे समजतो की मी मेलो तरी पण परत मनुष्य म्हणूनच माझा जन्म होईल, तर ती चूक आहे. अरे मूर्खा, तुझे विचार तर गाढवाचे

आहेत, मग तू मनुष्य होणार तरी कसा? तुला विचार येतात की कोणाचे उपभोगू? कोणाचे हिसकावून घेऊ? बिनहक्काचे भोगण्याचे जे विचार येतात, ते विचारच त्याला घेऊन जातात त्या त्या गतीमध्ये.

**प्रश्नकर्ता :** जीवाचा असा काही क्रम आहे का की मनुष्यात आल्यानंतर परत मनुष्यातच येईल की दुसरीकडे जाईल?

**दादाश्री :** हिन्दुस्तानात मनुष्यजन्मात आल्यानंतर चारही गतींमध्ये भटकावे लागते. फॉरेनच्या माणसांचे असे नाही. त्यांच्यात दोन-पाच टक्के अपवाद असतात, दुसरे सगळे वर चढतच राहतात.

**प्रश्नकर्ता :** लोक ज्याला विधाता म्हणतात ते कोणाला म्हणतात?

**दादाश्री :** ते निसर्गाला विधाता म्हणतात. विधाता नावाची कोणी देवी नाही. सायन्टिफिक सरकमस्टेन्शियल एविडन्स (वैज्ञानिक संयोगिक पुरावे) तेच विधाता आहे. आपल्या लोकांनी ठरवले आहे की, सहाव्या दिवशी विधाता लेख लिहून जातो. विकल्पांनी हे सगळे ठीक आहे आणि जर वास्तविक जाणून घ्यायचे असेल तर हे खरे नाही.

येथे तर कायदा असा आहे की ज्याने बिनहक्काचे घेतले असेल त्याचे दोन पायातून चार पाय होऊन जातील. परंतु ते नेहमीसाठी नाही. जास्तीत जास्त दोनशे वर्ष आणि फार तर सात-आठ जन्म जनावर गतीत जातील. आणि कमीत कमी पाचच मिनिटात जनावरात जाऊन परत मनुष्यात येईल. कित्येक जीव असे आहेत की एका मिनिटात सतरा जन्म बदलतात. म्हणजे असेही जीव आहेत. म्हणून जनावरात गेलेत, त्या सगळ्यांनाच शे-दोनशे वर्षाचे आयुष्य मिळेल असे नाही.

## हे समजते लक्षणांवरून

**प्रश्नकर्ता :** हे जनावर योनीत जाणार आहेत, याचा काही पुरावा तर सांगा. त्याला वैज्ञानिक आधारावर कशाप्रकारे मानायचे?

**दादाश्री :** इथे कोणी भुंकत राहतो असा मनुष्य भेटला आहे तुम्हाला? 'का भुंकत राहतोस?' असे तुम्ही त्याला बोलले होते? तो तिथून, कुत्र्याच्या योनीतून आला आहे. कोणी माकडासारख्या हालचाली करत असेल, तर ते ते तिथूनच आलेले असतात. कोणी मांजरीसारखे एकटक बघत असतात, आपले काही घेण्यासाठी, हिसकावण्यासाठी, ते तिथून आलेले असतात. अर्थात, ते इथे कुठून आले आहेत तेही ओळखू शकतो आणि कुठे जाणार आहेत हेही ओळखू शकतो, आणि ते सुद्धा कायमसाठी नाही. हे लोक तर असे आहेत की यांना पाप पण करता येत नाही.

या कलियुगात लोकांना पाप करणे येत नाही आणि करतात मात्र पापच! म्हणून त्यांच्या पापाचे फळ कसे असते? फार तर पन्नास-शंभर वर्ष जनावरात जाऊन परत इथल्या इथेच येतात, हजारो किंवा लाखो वर्ष नाही. आणि कित्येक तर पाच वर्षातच जनावरात जाऊन परत येतात, म्हणून जनावरात जाणे हा गुन्हा समजू नका. कारण की ते लगेचच परत येतात बिचारे. कारण तेवढे पाप ते करतच नाहीत ना! त्यांच्यात शक्तीच नाही असे पाप करण्याची.

## नियम, हानी-वृद्धीचा

**प्रश्नकर्ता :** या मनुष्यांची संख्या वाढतच चालली आहे, याचा अर्थ असा की जनावरे कमी झाली आहेत?

**दादाश्री :** हो, खरे आहे. जेवढे आत्मा आहेत तेवढेच आत्मा राहतात. पण 'कन्वर्जन' (रूपांतर) होत राहते. कधी मनुष्य वाढतात, तेव्हा जनावरे कमी होतात, आणि कधी जनावरे वाढतात तेव्हा मनुष्य कमी होतात. असे कन्वर्जन होत राहते. आता परत मनुष्य कमी होतील. आता सन 1993 पासून सुरूवात होईल कमी व्हायला.

तेव्हा लोक कॅल्क्युलेशन (मोजणी) करतील की सन 2000 मध्ये असे होईल आणि तसे होईल. हिंदुस्तानातील जनसंख्या वाढेल, मग

आपण काय खाणार? असे कॅल्क्युलेशन करतात, हो की नाही? ते कशासारखे आहे? 'सिमिली' (उपमा) सांगू?

एक चौदा वर्षांचा मुलगा असेल, त्याची उंची चार फूट आणि चार इंच असेल आणि अठराव्या वर्षी पाच फूट उंची असेल. तेव्हा म्हणतात की चार वर्षात आठ इंच वाढला. तेव्हा तो सत्तराव्या वर्षी किती वाढेल? असे गणित करतात. अशाच प्रकारे हे जनसंख्येचे कॅल्क्युलेशन करतात.

## मुलांना दुःख का?

**प्रश्नकर्ता :** निर्दोष मुलाला शारीरिक वेदना भोगावी लागते, त्याचे कारण काय?

**दादाश्री :** मुलाच्या कर्माचा उदय मुलाला भोगायचा आहे आणि 'आई'ला तो बघून भोगायचा आहे. मूळ कर्म मुलाचे आहे, त्यात आईची अनुमोदना होती. म्हणून 'आई'ला ते बघून भोगायचे आहे. म्हणजे करणे, करविणे आणि अनुमोदन करणे, ही तीन कर्मबंधनाची कारणे आहेत.

## मनुष्य जीवनाची महत्ता

मनुष्य देहात आल्यानंतर अन्य गतीमध्ये जसे की देव, तिर्यंच किंवा नरकात जाऊन आल्यानंतर परत मनुष्यदेह प्राप्त होतो. आणि भटकंतीचे अंत होणे, हे सुद्धा मनुष्य देहातूनच मिळते. हा मनुष्य देह जर सार्थक करता आला तर मोक्षाची प्राप्ती होऊ शकेल असे आहे, नाही तर भटकण्याची साधने वाढवेल, असेही आहे! दुसऱ्या गतींमध्ये केवळ सुटत जातो. परंतु या मनुष्यगतीत दोन्हीही आहेत. सुटतो आणि त्याचबरोबर बांधलाही जातो. दुर्लभ मनुष्य देह प्राप्त झाला आहे तर तेव्हा आपले (मोक्षाचे) काम काढून घ्या. अनंत जन्म आत्म्याने देहासाठी घालवले आहेत. एक जन्म जर देह आत्म्यासाठी काढेल तर कामच होऊन जाईल!

मनुष्य देहातच जर ज्ञानी पुरुष भेटले तर मोक्षाचा उपाय होईल.

देवताही मनुष्यदेहासाठी व्याकूळ असतात. ज्ञानी पुरुषांशी भेट झाल्याने, त्यांच्याशी तार जुळल्याने, अनंत जन्मापर्यंत शत्रू समान झालेला हा देह परम मित्र बनतो. म्हणून या देहात आपल्याला ज्ञानी पुरुष भेटले आहेत तर पूर्ण-संपूर्ण काम करून घ्या. पूर्ण तार जोडून तडीपार निघून जा.

## अजन्म-अमर आत्म्याला आवागमन कसे असणार?

**प्रश्नकर्ता :** परंतु आवागमनाचा फेरा कोणाला आहे?

**दादाश्री :** जो अहंकार आहे ना, त्याला आवागमन आहे. आत्मा तर मूळ दशेतच आहे. अहंकार मग बंद होतो. म्हणून त्याचे फेरे बंद होऊन जातात!

## मग मृत्यूचीही भीती नाही

**प्रश्नकर्ता :** मात्र ही सनातन शांती प्राप्त केली तर ती या जन्मापुरतीच असते की जन्म-जन्मांपर्यंत असते?

**दादाश्री :** नाही. ती तर परमनन्ट झाली. मग कर्ताच राहिला नाही, म्हणून कर्मबंधन नाही. एक किंवा दोन जन्मांनंतर मोक्ष होतोच. सुटकाच नाही. चालतच नाही. ज्याला मोक्षाला जायचे नसेल, त्याने हा धंदा करायचा नाही. या लाईनीत पडायचेच नाही. ज्याला मोक्ष पसंत नाही, त्याने या लाईनीत पडायचेच नाही.

**प्रश्नकर्ता :** हे सगळे ज्ञान आहे, ते दुसऱ्या जन्मात गेल्यावर आठवते का?

**दादाश्री :** सर्व त्या रूपातच असणार. काहीच बदलणार नाही. कारण (नवीन) कर्म बांधले जात नाहीत, त्यामुळे पुन्हा गुंता निर्माण होतच नाही.

**प्रश्नकर्ता :** तर याचा अर्थ असा झाला की आमच्या मागील जन्माची अशी कर्मे असतात, ज्यामुळे गुंता चालूच राहतो?

**दादाश्री :** मागील जन्मात अज्ञानतेने कर्म बांधले, त्या कर्मांचा हा इफेक्ट आहे. इफेक्ट भोगावेच लागतात. इफेक्ट भोगता भोगता, जर ज्ञानी भेटले नाही, तर परत नवीन कॉजेस आणि परिणाम स्वरूप नवीन इफेक्ट उत्पन्न होतच राहतात. इफेक्टमधून परत कॉजेस उत्पन्न होतात आणि ते कॉजेस परत पुढच्या जन्मी इफेक्ट देतात. कॉजेस ॲन्ड इफेक्ट, इफेक्ट ॲन्ड कॉजेस, कॉजेस ॲन्ड इफेक्ट, इफेक्ट ॲन्ड कॉजेस, कॉजेस ॲन्ड इफेक्ट, हे चालूच राहते. आणि ज्ञानी पुरुष जेव्हा कॉजेस बंद करून देतात, तेव्हा फक्त इफेक्टच भोगायचे राहतात. अर्थात कर्मबंधन होणे बंद झाले.

म्हणजे सर्व 'ज्ञान' लक्षात राहतेच, एवढेच नाही, तर स्वतः ते स्वरूपच होऊन जातो. मग मरणाचीही भीती वाटत नाही. कशाचीच भीती वाटत नाही, निर्भयता असते.

# अंतिमवेळेची जागृती

## जिवंत आहोत, तोपर्यंत

**प्रश्नकर्ता :** दादाश्री, ज्ञान घेण्याआधी या जीवनात जे पर्याय बांधले गेले आहेत, त्याचे निराकरण कसे होईल?

**दादाश्री :** आता जिवंत आहोत, तोपर्यंत पश्चाताप करून त्यांना धुवून टाकायचे, परंतु ते ठराविकच, पूर्ण निराकरण होत नाही. परंतु सैल तर होतातच. सैल होतात म्हणून पुढील जन्मात हात लावताच लगेच गाठ सुटून जाते.

**प्रश्नकर्ता :** प्रायश्चित्ताने बंध सुटतात?

**दादाश्री :** हो, सुटतात. ठराविक प्रकारचे कर्म बंध आहेत, ते कर्म प्रायश्चित केल्याने मजबूत गाठीतून सैल होतात. आपल्या प्रतिक्रमणात खूप शक्ती आहे. दादांना साक्षी ठेवून कराल तर काम होईल.

## हे ज्ञान प्राप्त झाल्यानंतर हिशोब महाविदेहचा

कर्माच्या धक्क्याने जे जन्म होणार असतील ते होतील. कदाचित एक-दोन जन्म. पण त्यानंतर सीमंधर स्वामींजवळच जावे लागेल. हा इथला धक्का, इथला हिशोब आधीच बांधला गेला आहे, थोडा चिकट झाला आहे, पण तो पूर्ण होऊन जाईल. त्यापासून सुटकाच नाही ना.

**प्रश्नकर्ता :** प्रतिक्रमण केल्याने कर्माचे धक्के कमी होतात?

**दादाश्री :** कमी होतात ना! आणि लवकर निकाल लागतो.

## 'आम्ही' असे केले निवारण विश्वापासून

जितक्या चुका संपवल्या प्रतिक्रमण करता करता, तितका मोक्ष जवळ आला.

**प्रश्नकर्ता :** त्या फाईली परत तर चिकटणार नाहीत ना, दुसऱ्या जन्मात?

**दादाश्री :** कशाला? दुसऱ्या जन्मात कशाला? आपण इथल्या इथेच इतके सारे प्रतिक्रमण करून टाकावे. वेळ मिळाला की त्यासाठी प्रतिक्रमण करतच राहिले पाहिजे. 'चंदुभाऊ'ला 'तुम्ही' एवढे इतके सांगावे लागेल की सतत प्रतिक्रमण करत रहा. तुमच्या घरातील सगळ्या सदस्यांना पूर्वी तुमच्याकडून जे जे काही दु:ख झाले असेल त्यांचे तुम्ही प्रतिक्रमण करावे. संख्यात अथवा असंख्यात जन्मांपासून जे राग-द्वेष, विषय, कषायचे दोष केले असतील, त्याची क्षमा मागतो. रोज एक-एक व्यक्तीचे, असे घरातील प्रत्येक व्यक्तीला आठवून प्रतिक्रमण करावे. नंतर आसपासचे, शेजारी-पाजारी सगळ्यांना आठवून उपयोग ठेवून प्रतिक्रमण करत राहिले पाहिजे. तुम्ही असे केल्यानंतर हे ओझे हलके होत जाईल. आपोआप काही हलके होणार नाही.

आम्ही पूर्ण विश्वासोबत अशाच प्रकारे निवारण केले आहे. आधी असे निवारण केले होते तेव्हाच तर सुटका झाली. जोपर्यंत आमचा दोष तुमच्या मनात आहे तोपर्यंत मला चैन पडणार नाही. म्हणून आम्ही जेव्हा असे प्रतिक्रमण करतो तेव्हा तिथे (दोष) पुसला जातो.

## मृतकांचे प्रतिक्रमण

**प्रश्नकर्ता :** ज्याची क्षमा मागायची आहे, त्या व्यक्तीचा देहविलय (मृत्यू) झाला असेल, तर प्रतिक्रमण कसे करायचे?

**दादाश्री :** देहविलय झाला असेल, तरी पण त्याचा फोटो असेल, त्याचा चेहरा आठवत असेल, तर तुम्ही प्रतिक्रमण करू शकता. चेहरा जरी आठवत नसेल आणि नाव माहीत असेल, तर नाव घेऊनही करू शकता, तरीही त्याला सर्व पोहोचेल.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे मृत व्यक्तीचे प्रतिक्रमण कशाप्रकारे करायचे?

**दादाश्री :** मन-वचन-काया, भावकर्म, द्रव्यकर्म, नोकर्म मृतकाचे नाव, तसेच त्याच्या नावाच्या सर्व मायेपासून भिन्न अशा त्याच्या शुद्धात्म्याला आठवायचे. आणि नंतर 'अशा चुका झाल्या होत्या' त्या आठवायच्या (आलोचना). त्या चुकांसाठी मला पश्चाताप होत आहे आणि त्यासाठी मला क्षमा करा (प्रतिक्रमण). अशा चुका पुन्हा होणार नाहीत असा दृढ निश्चय करतो, असे ठरवा (प्रत्याख्यान). 'तुम्ही' स्वतः चंदुभाऊचे ज्ञाता-दृष्टा रहायचे आणि जाणायचे की चंदुभाऊने किती प्रतिक्रमण केले, किती सुंदर केले आणि किती वेळा केले.

**जय सच्चिदानंद**

# अंतिमवेळेची प्रार्थना

ज्याची अंतिमवेळ जवळ आली असेल, त्याने अशाप्रकारे प्रार्थना करायला पाहिजे.

'हे दादा भगवान, हे श्री सीमंधर स्वामी प्रभू, मी मन-वचन-काया ...* (ज्याची अंतिम वेळ आली असेल त्या व्यक्तीने स्वत:चे नाव घ्यावे)' तथा ...*... नावाची सर्व माया, भावकर्म, द्रव्यकर्म, नोकर्म आपण प्रकट परमात्मा स्वरुप प्रभूंच्या सुचरणी समर्पित करीत आहे.

हे दादा भगवान, हे श्री सीमंधर स्वामी प्रभू, मी आपले अनन्य शरण स्वीकारत आहे. मला आपले अनन्य शरण मिळो. अंतिम क्षणी माझ्याजवळ हजर रहा. माझे बोट धरून मला मोक्षाला घेऊन जा. शेवटपर्यंत सोबत रहा.

हे प्रभू, मला मोक्षाशिवाय या जगातील दुसरी कोणतीही विनाशी वस्तू नको. माझा पुढील जन्म आपल्या चरणी आणि शरणीच होवो.

'दादा भगवानांचा असीम जय जयकार हो' बोलत रहावे.

(अशाप्रकारे त्या व्यक्तीने वारंवार बोलायचे अथवा त्याच्याकडून कोणीही वारंवार बोलवून घ्यावे.)

❖ ❖ ❖ ❖ ❖

# मृत व्यक्तीसाठी प्रार्थना

आपल्या कोणी मृत स्वजन किंवा मित्रासाठी अशाप्रकारे प्रार्थना केली पाहिजे.

'प्रत्यक्ष दादा भगवानांच्या साक्षीने, प्रत्यक्ष सीमंधर स्वामींच्या

साक्षीने, देहधारी... *(मृत व्यक्तीचे नाव घ्यावे)च्या मन-वचन-कायेचा योग, भावकर्म-द्रव्यकर्म, नोकर्माने भिन्न असे हे शुद्धात्मा भगवान, आपण अशी कृपा करा की ..*.. जिथे असतील तिथे त्यांना सुख-शांती मिळो, मोक्ष मिळो.'

आजच्या दिवसाच्या अद्यक्षणापर्यंत माझ्याकडून ..*.. च्यासाठी जे काही राग-द्वेष, कषाय झाले असतील, त्याबद्दल मी माफी मागतो. हृदयपूर्वक पश्चाताप करतो. मला क्षमा करा आणि पुन्हा असे दोष कधीच होणार नाहीत, अशी मला शक्ती द्या.

(अशाप्रकारे वारंवार प्रार्थना केली पाहिजे. नंतर जेव्हा जेव्हा मृत व्यक्तीची आठवण येईल, तेव्हा ही प्रार्थना केली पाहिजे.)

❖ ❖ ❖ ❖ ❖

## शुद्धात्म्या प्रति प्रार्थना

(दररोज एकवेळा बोलायची)

हे अंतर्यामी परमात्मा! आपण प्रत्येक जीवमात्रांमध्ये विराजमान आहात, तसेच माझ्यामध्ये पण विराजमान आहात, आपले स्वरूप तेच माझे स्वरूप आहे, माझे स्वरूप शुद्धात्मा आहे.

हे शुद्धात्मा भगवान! मी आपल्याला अभेदभावे अत्यंत भक्तिपूर्वक नमस्कार करीत आहे.

अज्ञानतेमुळे मी जे जे ★★ दोष केले आहेत, त्या सर्व दोषांना आपल्या समक्ष जाहीर करीत आहे. त्यांचे हदयपूर्वक खूप पश्चाताप करीत आहे आणि आपल्याजवळ क्षमा प्रार्थित आहे. हे प्रभू! मला क्षमा करा, क्षमा करा, क्षमा करा आणि पुन्हा असे दोष करू नये अशी आपण मला शक्ती द्या, शक्ती द्या, शक्ती द्या.

हे शुद्धात्मा भगवान ! आपण अशी कृपा करा की  आमचे भेदभाव मिटून जावे आणि अभेद स्वरूप प्राप्त व्हावे. आम्ही आपल्यात अभेद स्वरूपाने तन्मायाकार राहो.

★★ (जे जे दोष झाले असतील ते सर्व मनात जाहीर करावे.)

## प्रतिक्रमण विधी

प्रत्यक्ष दादा भगवानांच्या साक्षीने देहधारी...... (ज्याच्या प्रति दोष झाला असेल त्या व्यक्तीचे नाव) च्या मन-वचन-कायेचे योग, भावकर्म, द्रव्यकर्म, नोकर्माहून भिन्न असे हे शुद्धात्मा भगवान! आपल्या साक्षीने, आजच्या दिवसापर्यंत जे जे ★★ दोष झाले आहेत, त्यांची मी क्षमा मागत आहे, हृदयपूर्वक खूप पश्चाताप करीत आहे. मला क्षमा करा, क्षमा करा, क्षमा करा. आणि पुन्हा असे दोष कधीही करणार नाही, असा दृढ निश्चय करीत आहे, त्यासाठी मला परम शक्ती  द्या.

★★ क्रोध-मान-माया-लोभ, विषय-विकार, कषाय इत्यादीमुळे त्या व्यक्तीला दु:ख दिले गेले असेल त्या सर्व दोषांना मनात आठवायचे.

❖ ❖ ❖ ❖ ❖

# दादा भगवान फाउंडेशनची प्रकाशित पुस्तके

## मराठी

1. भोगतो त्याची चूक
2. एडजस्ट एवरीव्हेर
3. जे घडले तोच न्याय
4. संघर्ष टाळा
5. मी कोण आहे ?
6. क्रोध
7. चिंता
8. प्रतिक्रमण
9. भावना सुधारे जन्मोजन्म
10. कर्माचे विज्ञान
11. पाप-पुण्य
12. आई-वडील आणि मुलांचा व्यवहार
13. पति-पत्नीचा दिव्य व्यवहार
14. समजपूर्वक प्राप्त ब्रह्मचर्य
15. मानव धर्म
16. मृत्युवेळी, आधी आणि नंतर
17. सेवा-परोपकार
18. दान
19. त्रिमंत्र
20. वर्तमान तीर्थंकर श्री सीमंधर स्वामी
21. चमत्कार
22. सत्य-असत्याचे रहस्य
23. वाणी, व्यवहारात
24. पैशांचा व्यवहार
25. क्लेश रहित जीवन
26. निजदोष दर्शनाने...निर्दोष!
27. प्रेम
28. गुरू-शिष्य
29. अहिंसा

## हिन्दी

1. ज्ञानी पुरुष की पहचान
2. सर्व दु:खों से मुक्ति
3. कर्म का सिद्धांत
4. आत्मबोध
5. मैं कौन हूँ ?
6. वर्तमान तीर्थकर श्री सीमंधर...
7. भुगते उसी की भूल
8. एडजस्ट एवरीव्हेयर
9. टकराव टालिए
10. हुआ सो न्याय
11. चिंता
12. क्रोध
13. प्रतिक्रमण
14. दादा भगवान कौन ?
15. पैसों का व्यवहार
16. अंत:करण का स्वरूप
17. जगत कर्ता कौन ?
18. त्रिमंत्र
19. भावना से सुधरे जन्मोंजन्म
20. प्रेम
21. माता-पिता और बच्चों का व्यवहार
22. समझ से प्राप्त ब्रह्मचर्य
23. दान
24. मानव धर्म
25. सेवा-परोपकार
26. मृत्यु समय, पहले और पश्चात
27. निजदोष दर्शन से... निर्दोष
28. पति-पत्नी का दिव्य व्यवहार
29. क्लेश रहित जीवन
30. गुरु-शिष्य
31. अहिंसा
32. सत्य-असत्य के रहस्य
33. चमत्कार
34. पाप-पुण्य
35. वाणी, व्यवहार में...
36. कर्म का विज्ञान
37. आप्तवाणी - 1 से 9 और 13 (पूर्वार्ध-उत्तरार्ध)
38. समझ से प्राप्त ब्रह्मचर्य (पूर्वार्ध-उत्तरार्ध)
39. ज्ञानी पुरुष

★ **दादा भगवान फाउन्डेशन द्वारे गुजराती आणि इंग्रजी भाषेत सुद्धा बरीच पुस्तके प्रकाशित झाली आहे। वेबसाइट www.dadabhagwan.org वर सुद्धा आपण ही सगळी पुस्तके प्राप्त करू शकता।**

★ **प्रत्येक महिन्यात हिन्दी, गुजराती आणि अंग्रेजी भाषेत दादावाणी मेगेझीन प्रकाशित करीत आहे।**

# दादा भगवान परिवार


**अडालज** : **त्रिमंदिर**, सीमंधर सिटी, अहमदाबाद-कलोल हाईवे, पोस्ट : अडालज, जि.-गांधीनगर, गुजरात - 382421. फोन : (079) 39830100

**राजकोट** : **त्रिमंदिर**, अहमदाबाद-राजकोट हाईवे, तरघड़िया चोकड़ी (सर्कल), पोस्ट : मालियासण, जि.-राजकोट. फोन : 9924343478

**भुज** : **त्रिमंदिर**, हिल गार्डनच्या मागे, एयरपोर्ट रोड. फोन : (02832) 290123

**अंजार** : **त्रिमंदिर**, अंजार-मुंद्रा रोड, सिनोग्रा पाटीया जवळ, सिनोग्रा गाँव, ता-अंजार. फोन : 9924346622

**मोरबी** : **त्रिमंदिर**, पो-जेपुर (मोरबी), नवलखी रोड, ता-मोरबी, जि-राजकोट, फोन : (02822) 297097

**सुरेन्द्रनगर** : **त्रिमंदिर**, लोकविद्यालय जवळ, सुरेन्द्रनगर-राजकोट हाईवे, मुळी रोड. फोन : 9879232877

**अमरेली** : **त्रिमंदिर**, लीलीया बायपास चोकडी, खारावाडी. फोन : 9924344460

**गोधरा** : **त्रिमंदिर**, भामैया गाँव, एफसीआई गोडाउन समोर, गोधरा, (जि.-पंचमहाल). फोन : (02672) 262300

**वडोदरा** : **त्रिमंदिर**, बाबरिया कोलेज जवळ, वडोदरा-सुरत हाई-वे NH-8, वरणामा गाँव. फोन : 9574001557

**जामनगर** : **त्रिमंदिर,** व्रजभूमि-1 च्या समोर, TGES स्कूल जवळ, माणेक नगर, राजकोट रोड.

**अहमदाबाद** : **दादा दर्शन**, 5, ममतापार्क सोसाइटी, नवगुजरात कॉलेजच्या मागे, उस्मानपुरा, अहमदाबाद-380014. फोन : (079) 27540408

**वडोदरा** : **दादा मंदिर**, 17, मामानी पोळ-मुहल्ला, रावपुरा पुलिस स्टेशन समोर, सलाटवाड़ा, वडोदरा. फोन : 9924343335

| | | | |
|---|---|---|---|
| **मुंबई** | : 9323528901 | **दिल्ली** | : 9810098564 |
| **कोलकता** | : 9830093230 | **चेन्नई** | : 9380159957 |
| **जयपुर** | : 9351408285 | **भोपाल** | : 9425024405 |
| **इन्दौर** | : 9039936173 | **जबलपुर** | : 9425160428 |
| **रायपुर** | : 9329644433 | **भिलाई** | : 9827481336 |
| **पटना** | : 7352723132 | **अमरावती** | : 9422915064 |
| **बेंगलूर** | : 9590979099 | **हैदराबाद** | : 9989877786 |
| **पूणे** | : 9422660497 | **जालंधर** | : 9814063043 |

**U.S.A.** : **DBVI Tel. :** +1 877-505-DADA (3232),
**Email :** info@us.dadabhagwan.org

| | | | |
|---|---|---|---|
| **U.K.** | : +44 330-111-DADA (3232) | **Australia** | : +61 421127947 |
| **Kenya** | : +254 722 722 063 | **New Zealand** | : +64 21 0376434 |
| **UAE** | : +971 557316937 | **Singapore** | : +65 81129229 |



अंतिम दिवसात ऑक्सिजनवर, तरीही मुक्तहास्य...

## पोहोचतात मात्र भावनांचे स्पंदन

मुलाचा (किंवा कोणत्याही नातेवाईकाचा) मृत्यू झाल्यानंतर त्याच्या मागे चिंता केल्यामुळे त्याला दुःख होते. आपले लोक अज्ञानतेमुळे हे सर्व करतात. म्हणून तुम्हाला जसे आहे तसे समजून घेऊन शांततापूर्वक राहिले पाहिजे. व्यर्थ डोकेफोड करण्यात काय अर्थ आहे? हे तर संसाराचे ऋणानुबंध आहेत, घेण्या-देण्याचा हिशोब आहे. मृत्यू होणे म्हणजे काय? तर वहीखात्यातील हिशोब पूर्ण होणे. आपल्याला जर त्याची खूप आठवण येत असेल तर काय करावे? वीतराग भगवंतांना सांगावे की, त्याला शांती द्या. आपण भावना केली तर ती भावना त्यांच्यापर्यंत पोहोचतेच!

-दादाश्री

मूल दीपक से प्रकटे दीपमाला

dadabhagwan.org

ISBN 978-93-86321-03-9

9 789386 321039

Printed in India

Price ₹15